अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**विषय यादी**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ४४ | दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४ दि. ८ /२/२०१३ अन्वये शिफारशी सह मंजूरीसाठी |
| ४६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

उपरोक्त विषयाकरीता मा. खास सभा बोलविण्याबाबत मा.श्री.नितिन वि.जगताप मा.श्री.गणेश ख.कवडे,मा.सौ.संगीता र.खरमाळे,मा.सौ.निलीमा व.गायकवाड,श्री.दिलीप ना.सातपुते आदी नगरसेवकांनी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याबाबत केलेल्या मागणी नुसार सभा बोलविणे कामी कृपया तारीख व वेळ मिळणेबाबत विनंती आहे.

प्र.नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**सभा क्रमांक ०९ सोमवार दिनांक १८/०२/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणा-या मा. खास सभेची विषय पत्रिका**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ४४ | दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४ दि. ८ /२/२०१३ अन्वये शिफारशी सह मंजूरीसाठी |
| ४६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा. महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १३-०२-२०१३
अहमदनगर

प्र.नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर  महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०९ / २०१३
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १३- ०२ -२०१३.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या  अंदाजपत्रकीय  मा. खास  सभेची सुचना.**

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०९,   दिनांक १८-०२-२०१३.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

यांस-

महोदय / महोदया,

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१(ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची मा. खास  सभा सोमवार दिनांक १८-०२-२०१३ रोजी  दुपारी १.०० वाजता माळीवाडा येथील **"जुने महानगरपालिका सभागृहात"** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४४** **दिनांक : १८ /०२ /२०१३**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | मराठी रंगभुमी व चित्रपटसृष्टीतील प्रसिध्द कलावंत १) श्री आनंद अभ्यंकर २) श्री अक्षय पेंडसे ३)चि.प्रत्युष पेंडसे यांचे पुणे येथे सोमवार दिनांक २४/१२/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | कोपरगांव नगरपालिकेतील नगरसेवक श्री पुरब कुदळे यांचे बुधवार दिनांक २६/१२/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ३ | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते व मा.उपनगराध्यक्ष मा.कृष्णा जाधव यांचे शुक्रवार दिनांक ०१/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४ | चेन्नई येथील ज्येष्ठ व्हायोलिनवादक एम.एस.गोपालकृष्णन यांचे गुरुवार दिनांक ०३/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | अहमदनगर शहरातील निवृत्त पोलीस कर्मचारी श्री.आसाराम माधव दाणी यांचे बुधवार दिनांक २२/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | अहमदनगर शहरातील ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक व संघटक मेजर दिनूभाउ कुलकर्णी यांचे मंगळवार दिनांक २२/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | नागापुर येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुळसाआई पाटीलबुवा नागरगोजे यांचे शनिवार दिनांक २६/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | संगमनेर येथील ज्येष्ठ शिक्षण तज्ञ म.वि.तथा मामासाहेब कौंडिण्य यांचे सोमवार दिनांक २८/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत श्री.ठाकूरदास बंग यांचे मंगळवार दिनांक २९/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १० | लातूर येथील अखिल भारतीय छावा मराठा युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री अण्णासाहेब जावळे यांचे मंगळवार दिनांक २९/०१/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ११ | पिंपळगांव पिसा येथील ज्येष्ठ कामगार व कम्युनिष्ट नेते श्री रंगनाथ पंदरकर यांचे गुरुवार दिनांक ०७/०२/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १२ | माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते श्री मुरलीधर भोसले यांचे गुरुवार दिनांक १४/०२/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४५** **दिनांक : १८ /०२ /२०१३**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४ दिनांक ८ /२/२०१३ अन्वये शिफारशी सह मंजूरीसाठी

--**--

**प्रस्तावाचा मजकूर :-** अर्थ विभाग जा.क्र. ३९२ दिनांक १३/०२/२०१३

सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती ठराव क्र.८४ दिनांक ०८/०२/२०१३ अन्वये मंजुरी देण्यात आली असून अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सूचित केले आहे.

सन २०१२-२०१३चे सुधारीत व सन२०१३-२०१४चे मुळ अंदाजपत्रक दि.२०/०२/२०१३पूर्वी मंजूर होणे आवश्यक असल्याने तातडीने सदरचा विषय घेणेत यावा. ही विनंती.

--**--

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८४ दिनांक ०८/०२/२०१३ चा ठराव खालील प्रमाणे --

**मा.स्थायी समिती ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासहचे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करित आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे. (**सोबत**-सन २०१२-२०१३ सालचे सुधारीत व सन २०१३-२०१४ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता)

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्र.१** :- वसुली विभाग- मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणी बाबत.

**प्रस्ताव क्र.२** :- वसुली विभाग- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम १८ (१) नुसार वृक्ष उपकाराची आकारणीबाबत.

**प्रस्ताव क्र.३** :- वसुली विभाग- जललाभ कर व मललाभ कर आकारणीबाबत.

**प्रस्ताव क्र.४** :- जकात विभाग- पारगमन पास फी रू.६०/- सहा चाका पर्यत व रू.१००/- सहा चाकापेक्षा जास्त चाकी वाहनाकरीता असलेली पारगमन फी ऐवजी सर्व वाहनावर एकच दर म्हणजे रू.१००/- प्रमाणे पारगमन फी मध्ये सुधारणा करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.५**:- अग्निशमन विभाग- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणेबाबत.

**प्रस्ताव क्र. ६ :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणेबाबत.

**या प्रस्तावास पुढिलप्रमाणे शिफारस करण्यांत येत आहे.**

**प्रस्ताव क्र.१** :- मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणी बाबत.-- या फी मध्ये १/२ टक्का वाढ करण्यांत यावी एकुण १ टक्का फी आकारण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र.२** :- यामध्ये दरवाढ करण्यांत येवू नये. पुर्वीप्रमाणे आकारणी करण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र.३** :- यामध्ये दरवाढ करण्यांत येवू नये. पुर्वीप्रमाणे आकारणी करण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र.४** :- ऑफिस रिपोर्ट नुसार व झालेल्या चर्चेनुसार ६ चाकांच्या वाहनाकरीता १००/- रुपये शुल्क आकारावे तसेच ६ चाकांच्या पुढे १५०/- प्रती वाहनासाठी शुल्क आकारणी करण्यांस शिफारस आहे.

**प्रस्ताव क्र.५**:- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणेत येवू नये. मात्र अग्निशमन सक्षमीकरणासाठी मा.शासनाकडे विशेष निधीची मागणी करण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र. ६ :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणेबाबत ऑफिस रिपोर्टनुसार मान्यता देणेकामी शिफारस आहे. सदर कार्यक्रम महिला व बालकल्याण कार्यक्रम या लेखाशिर्षामधुन करण्यांत यावा.

**तसेच**

* महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या पाल्यांकरीता इ.१२ वी व १० वी मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण प्राप्त करतील अशा सर्व विद्यार्थांचा रोख स्वरूपात रक्कम देवून सत्कार करणेस शिफारस आहे.

* महानगरपालिकेच्या मालकीच्या बेलदार गल्ली, सर्जेपुरा येथे मोकळया जागेमध्ये मंगल कार्यालय बांधकाम करणेकामी **नवीन इमारत** या लेखाशिर्षा मधुन रक्कम रू.५ लाखाचा खर्च भागविण्यास शिफारस आहे.

**१)** कोंडवाडा व महालक्ष्मी उद्यान खाजगी करणाच्या माध्यमातुन चालविण्यांस देण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

**२)** सेप्टीक टँक सफाईचे काम खर्चाच्या दृष्टीने मनपास परवडत नसल्याने सदरची सेवा खाजगी करणाच्या माध्यमातुन सुरु करण्यासाठी ही सभा शिफारस करीत आहे. मा.महासभेमध्ये खाजगीकरणा बाबत निर्णय झाल्यास पुढील कार्यवाही मा.स्थायी समितीकडे सविस्तर प्रस्ताव पाठवून निविदा मागविण्याबाबत कार्यवाही करावी.

**३)** जाहीरात बोर्ड जागा भाडे याबाबत इतर महानगरपालिकेतुन माहिती मागवुन त्यानुसार उत्पन्न वाढीच्या दृष्टीने आवश्यक तो प्रस्ताव सत्वर सादर करण्यांत यावा.

**४)** सावेडी उपनगरामधील कचरा वहातुक वाहनांकरीता इंधन पुरवठा करणेकामी स्वतंत्र व्यवस्था करण्यांत यावी. त्यामुळे इंधन खर्चात बचत होईल.

**५)** गाळे हस्तांतरण फी मधुन मिळणारे उत्पन्न बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडुन रक्कम जमा करण्यांत यावी. व या रक्कमेतुन सावेडी भागामध्ये व्यापारी संकुल इमारत उभारणे कामी खर्च भागवावा.
**६)** गंगाउद्यान मागील जागेत महिलांकरीता जलतरण तलाव, जीम व जॉगिंग ट्रॅक बांधण्या बाबत स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन रक्कम रुपये २५ लक्षची तरतुद करण्यांत यावी.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१२-२०१३ सालचे सुधारित **व** सन २०१३-२०१४सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या स्कुल बोर्डासह शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर**

**मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१२-२०१३ चा सुधारीत अर्थसंकल्प**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१२).....................................................५५४१८२३१**

**एकुण जमा....................................................................................... ३६९०९१८४०४**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा..........................................................३७४६३३६६३५**

**एकुण खर्च........................................................................................ ३६१४६७३५०४**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१३)..................................................१३१६६३१३१**

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिक्षण कर मार्केट | ६००० | १०००००० | | १००६००० |
| | | | | | |
| | | **६०००** | **१००००००** | **०** | **१००६०००** |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिक्षण कर मार्केट | ६००० | १०००००० | | १००६००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | विळद वाया जाणा-या पाण्याचा पुर्नवापर करणे / पाण्याची टाकी- परिसर बळकटीकरण / पाणी पुरवठा बांधकाम विषयक कामे, नविन सुधारणा कामे. | ५००००० | ४५००००० | | ५०००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | **५०६०००** | **५५०००००** | **०** | **६००६०००** |

सही /-
श्री. बाबासाहेब वाकळे,
सभापती , स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

| **अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर** |
|---|
| **मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१३-२०१४ चा सुधारीत अर्थसंकल्प** |
| |
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१३)......................................................१३१६६३१३१** |
| **एकुण जमा.................................................................................... ४०५२९३००००** |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा........................................................... ४१८४५९३१३१** |
| **एकुण खर्च.................................................................................... ४१२४७५५०००** |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१४)................................................... ५९८३८१३१** |
| |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पारगमन शुल्क | २४८४०००००० | ७००००००० | | ३१८४०००००० |
| २ | गाळे हस्तांतरण फी | १००००० | १९९००००० | | २००००००० |
| ३ | रेखांकन अंतर्गत सुधारणा | १००००००० | १००००००० | | २००००००० |
| ४ | अग्निशमन कर | ५००००० | | ५०००००० | ० |
| ५ | मालमत्ता नाव नोंदणी फी | १५०००००० | ५०००००० | | २००००००० |
| | | | | | |
| | | **२७८५००००००** | **१०४९००००००** | **५०००००००** | **३७८४००००००** |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महापौर शहर विकास निधी | ० | ४००००००० | | ४००००००० |
| २ | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| ३ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| ४ | सभापती- महिला व बाल शहार विकास निधी | ० | १५०००००० | | १५०००००० |
| ५ | उपसभापती- महिला व बाल शहर विकास निधी | ० | १०००००० | | १०००००० |
| ६ | वॉर्ड विकास निधी | ० | ३१८०००००० | | ३१८०००००० |
| ७ | गंगा उद्यान मागील जागेत महिलांकरीता जलतरण तलाव, जिम व जॉगिंग ट्रॅक करणे | ० | २५०००००० | | २५०००००० |
| ८ | उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते विकास | ५०००००० | २५०००००० | | ७५०००००० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा | १०००००००० | १०००००००० | | २०००००००० |
| १० | खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतूक करणे, वाहन खरेदी, डिझेल इ. खर्च | ३०००००००० | | २५०००००० | २७५०००००० |
| ११ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | १५०००००० | १०००००० | | २५०००००० |
| १२ | विद्याथ्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे | २५००० | ५०००० | | ७५००० |
| | | | | | |
| | | **४६५२५०००** | **९५३५००००** | **२५०००००** | **१३९३७५०००** |

सही /-

श्री. बाबासाहेब वाकळे,

सभापती , स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

**मा.महासभेची चर्चा :-**

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** या बजेट मध्ये अनेक उपयुक्त योजना घेतलेल्या आहेत त्याबद्दल अभिनंदन. तसेच केडगांव मधील पाणी योजनेच्या कामाकरीता खोदल्यामुळे रस्त्यांची अवस्था खराब झालेली आहे. त्यांच्या दुरुस्ती करीता एक ते दोन कोटींची व्यवस्था करण्यांत यावी. सावेडी सारखा

जलतरण तलाव, गार्डन करावे. फायर फायटर साठी जागेची तरतुद आहे पण तेथे गाडी ठेवावी. शववाहिके करीता तरतुद करण्यांत यावी.

**मा.सौ.मालन ढोणे :-** बजेट मंजूरी नंतर वापरण्यास किती वेळ लागेल आमच्या वार्ड मधील कामे कधी होणार. लवकर मंजूरी येत नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** जकात बंद झाल्याने नियोजन केले होते. यावर्षी फारशी अडचण येणार नाही. यावर्षी जी कामे मंजूर केली ती पुढील वर्षी कंटीन्यू करणार आहोत. दिनांक ३१ मार्च अखेरपर्यंत झालेली कामे थकीत मध्ये जातील.

**मा.सौ.मालन ढोणे :-** अंदाजपत्रक तरतुद लवकरात लवकर उपलब्ध करावी.

**मा.श्री.सचिन पारखी :-** सर्वांनी शांततेत बोर्ड चालवावे व सर्वांना बोलण्याची संधी देण्यांत यावी. ही सर्व सदस्यांना सुरुवातीस विनंती करतो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** बजेटचे वाचन करा.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** बजेट वाचनात वेळ घालवू नका.

**मा.श्री.शेख नजीर मोहंमद नसीर :-** ज्या रस्त्यांची दुरुस्ती थांबली आहे. त्यांच्या पॅचिंगची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** हे बोर्ड महत्वाचे असल्याने एकेकाने बोलावे.

मुख्यलेखाधिकारी यांनी मा.आयुक्त साहेबांचे मनोगत वाचले.

**मा.श्री.निखिल वारे :-** चोपडा साहेब व भोसले साहेब यांचे मी अभिनंदन करतो त्यांनी शहरातील नागरिकांच्या अंत्यविधीचा खर्च महानगरपालिकेने करण्याचे जी मागणी केली आहे त्याला पाठींबा देत आहोत. विकास कामांसाठी थोडी रक्कम उपलब्ध होईल म्हणजे किती रक्कम उपलब्ध होईल हे सांगावे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शेलार :-** १० कोटी.

**मा.श्री.निखील वारे :-** ज्या तरतुदी नियमाला धरुन आहेत त्यालाच या बजेट मध्ये मान्यता द्यावी हि विनंती करतो.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्पाचा भारतीय जनता पक्षाच्या वतीने अभिनंदन स्वागत करतो. काही प्रश्न आहेत त्यांचा खुलासा करावा १. हे बजेट शिल्लकी आहे की त्रुटीचे ?

**मुख्यलेखाधिकारी :-** शिल्लकीचे.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** त्याचे सूत्र काय ?

**मुख्यलेखाधिकारी :-** जर रक्कम खर्च करुन शिल्लक राहिली तर त्यास शिल्लकी म्हणतात.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** म्हणजेच उत्पन्न - खर्च = शिल्लक का ?

**मुख्यलेखाधिकारी :-** आवश्यक तेवढी रक्कम वसुल जमा होत नाही.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** आवश्यक त्या खर्चाची रक्कम संविधानिक खर्च वजा जाता किती शिल्लक रहाते. मागील तीन वर्षाची शिल्लक सांगा.

**मुख्यलेखाधिकारी :-** पान क्रमांक ११२ वरील तरतुदी प्रमाणे, सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरीता ११५ कोटी.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** अपेक्षित जमा न झाल्यास दायित्व कसे भागवतात.

**मुख्यलेखाधिकारी :-** खर्च कमी करतो.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** आपण पगार दिले नाहीत. सोसायटीचे पैसे दिले नाहीत. आगामी निवडणुका आल्यावर कारभार चालणे कठीण होईल. विकास कामे होणार नसतील तर बजेटचा उपयोग काय ?

**मा.आयुक्त साहेब :-** आकडेवारी रियल असते. १२१ कोटी थकबाकी आहे. १०२ कोटी वसुल अपेक्षित आहे. मुळात बांधील खर्च सहा ते सात कोटी दर महा करणे आवश्यक असते महानगरपालिकेचे अंदाजपत्रक असते त्यामध्ये अंदाजे उत्पन्न व खर्च असतात.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** दोन महिने पगार होत नाहीत. तीन महिन्याचा पगार लेखा नमुना क्रमांक ७३ नुसार वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** ही तरतुद नगरपरिषदेची आहे. महानगरपालिके करीता लेखा संहिता नाही. वेतनराखीव निधीची तरतुद नाही.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** कर्ज निवारण निधी, सिंकींग फंड तयार केला आहे काय ?

**मुख्यलेखाधिकारी :-** परत फेड या लेखाशिर्षाखालील पाणी पुरवठाकरीता तरतुद केली आहे.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** पाणी पुरवठयाचा ७२.२३ कोटींचा कर्ज प्रस्ताव आहे. आता कर्ज काढणे व परत फेड बाबत माहिती द्या.

**मा.आयुक्त साहेब :-** कर्ज घेण्याकरीता प्रस्तावावर मा.महासभेने मंजूरी दिली आहे. सुधारित प्रस्ताव आणीत आहोत ही बाब आपल्यापुढे येणार आहे.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे कर्ज असतांनाही हे कर्ज आपण का लादत आहात.

**मा.आयुक्त साहेब :-** हा विषय महासभेपुढे आणणारच होतो.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** शासनाकडुन प्राप्त होणा-या निधीच्या १० टक्के निधी वाहतुक पोलीस, रस्त्यावर पट्टे मारणे, सोयी करणे इत्यादी करीता ठेवणे बंधनकारक आहे. त्यामुळे ५० चौक निवडुन सी.सी.टी व्ही कॅमेरे बसविणे करीता २५ लाख रुपये तरतुद करावी हि विनंती.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** लोंढे साहेबांनी केलेला मुद्दा बरोबर आहे. आपण कर्ज घेतो ते कशासाठी घेतो व त्याचा उपयोग काय हे स्पष्ट करा.

**मा.आयुक्त साहेब :-** दोन पाणी पुरवठा योजना आहेत. त्यात केडगांवची एक आहे. त्याकरीता लगेच गरज नाही पण दुस-या योजनेत ३० कोटी रुपयांची तुट येत आहे. त्याचा आपला हिस्सा भरण्याकरीता ३१ मार्च ही तारीख दिली होती. याकरीता निधी नाही व योजना पूर्ण होणे आवश्यक आहे. हा मिळणारा निधी जाउ नये या करीता हे कर्ज आवश्यक आहे. जरी ३० कोटीचे कर्ज घेतले तरी टप्प्या टप्प्याने मिळणार आहे. रस्ते गटारी या विविध प्रकल्पांकरीता ४४ कोटी कमी पडतात या करीता बँका व इतर संस्था यांना प्रस्ताव केले पण ते मान्य न झाल्याने हुडकोला प्रस्ताव दिल्यावर तत्वतः मान्यता हुडकोने दिली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** उत्पन्नाचे स्त्रोत सांगा.

**मा.आयुक्त साहेब :-** एल.बी.टी. व मालमत्ता कर.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** मालमत्ता कर थकबाकी किती.

**मा.आयुक्त साहेब :-** १०२ कोटी रुपये थकबाकी आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** या थकबाकी वसुली करीता प्रयत्न न करता कर्ज का घेता. आपले कर्मचारी काय करतात. आजचे वसुलीचे आकडे काय ? ही वसुली का वसुल होत नाही. कीतीतरी प्रॉपर्टी तयार आहेत. लोक येतात त्यांना बिले का देत नाहीत.

**मा.आयुक्त साहेब :-** मार्च अखेरी पर्यंत आपण मोठी वसुली करणार आहोत तरीही बांधील खर्च करुन विकासा करीता पैसे शिल्लक रहाणार नाही. हा प्रस्ताव मांडला आहे. आपण मान्यता दिली तर प्रकल्प होतील.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** वसुली विभागाचे काम सुधारले पाहिजे. जर नागरिक भरण्यास तयार आहेत पण बिले देत नाही तर कसे नागरीक पैसे भरतील.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** सन २०१३-२०१४ चे बजेट १ एप्रिल २०१३ पासून सुरु करणार का.

**मा.आयुक्त साहेब :-** ठराव झाला की लगेच होईल.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** टप्प्याने रिलीज करणार का ?

**मा.आयुक्त साहेब :-** लवकरात लवकर रिलीज करु .

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** अर्थसंकल्पावर चर्चा करतांना वाचतांना लक्षात आले की तारेवरची कसरत प्रशासन व स्थायी समितीने केली आहे. काही बाबी मी निदर्शनांस आणू इच्छितो. १) पवार साहेब यांनी विचारल्या प्रमाणे वसूली व रिव्हीजनचे काम योग्य होते की नाही. अनेक घरे तयार होतात. विना परवाना होतात त्यांना परवानगी कंम्प्लीशन नसते हे वसुल केले तर कर्जाची वेळ येणार नाही. २) घरपट्टी बरोबरच इतरही उत्पन्नाची साधने विकसीत करावीत.

**मा.श्री.संभाजी कदम :-** घरपट्टी हे महत्वाचे स्त्रोत आहे. जर घर बांधले तर त्याच्या नावावर बील कसे येते ही प्रक्रीया सांगा. ५-६ वर्षाची मागणी करता हे योग्य आहे का ?

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** ओपन प्लॉट वर नाव नोंदवतो.

**मा.श्री.संभाजी कदम :-** जुन्या नावावर प्लॉट आहे व नविन मालक रहातो. अशी उदाहरणे आहेत. जर परवानगी न घेता बांधकाम केले तर नोंद कशी घेता.

**मा.श्री.संग्राम जगताप / मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** प्रक्रीया सांगा.

**श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :-** बांधकाम अनधिकृत असेल तर ज्या दिवशी परवानगी दिली जाते. सदरच्या आधीच्या एक वर्षापासुन बील दिले आहे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** जो नियमाने बांधतो त्याला कंम्प्लीशनला का आडवता. नाव नोंदणी लवकर होत नाही आपला टॅक्स बुडतो.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** बांधकाम परवानगी दिली असता बांधकाम पूर्ण झाल्यावरच अटी - नियमांचा भंग झाला की नाही ते समजते.

**मा.श्री.संभाजी कदम :-** कर्मचा-यांनी वेळेवर कामाची तपासणी केली तर उत्पन्न लवकर सुरु होईल व लोकांना त्रास होणार नाही.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** बांधकाम पुर्ण झाल्यावर वसुली कर्मचारी यांनी लगेचच जावुन आकारणी सुरु करता येईल का ?

**मा.आयुक्त साहेब :-** होय. करता येईल.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** प्लॅन मंजूरी दिली आणि मंजूरीची नोंद झाल्यावर लगेचच भेट देवुन मोजणी करुन कर आकारावेत. वर्ष झाली तरी वेगळी तारीख दाखवली जाते.

**मा.श्री.संभाजी कदम :-** अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्यासाठी आपण किती रक्कम घेतो.

**मा.आयुक्त साहेब :-** दुप्पट घरपट्टी आकारता येते. याकरीता जीआयएस सिस्टीम वापरुन सर्व्हे करणार आहोत.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** आपल्या स्टाफनेही सक्षमपणे काम करणे आवश्यक आहे. या विभागाचा रिव्ह्यु घेतला का. रिव्हीजन कधी घेतली या बाबत काही नियम आहेत का ? दरवर्षी केली पाहिजे. वरचा मजला बांधल्यास नोंद होत नाही हे झाले तर उत्पन्न वाढेल.

**मा.श्री.शेख नजीर :-** कंम्प्लीशनला प्लॅन टाकतात त्याची प्रक्रीया अडचणीची आहे ती सोपी करावी.

**नगररचनाकार श्री.दहे :-** ३०० स्क्वेअर मीटरला झाडांची लागवड तरतुद सक्तीची आहे.

**मा.श्री.शेख नजीर :-** कर्मचारी अनेक कारणे दाखवुन विलंब करतात.

**नगररचनाकार श्री.दहे :-** कंम्प्लीशन घेण्याचे प्रमाण फार कमी आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** अनेक इमारतींना कंम्प्लीशन दिले तिथे झाडे नाहीत तरी कंम्प्लीशन दिले आहेत.

**मा.श्री.संभाजी कदम :-** रेग्युलर करतांना सहा वर्षाची घरपट्टी मागता ते बरोबर आहे काय ?

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** सहा वर्षाची मागील आकारणी मागणी करण्याची तरतुद आहे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** बांधकाम करतांना कर्मचारी काय करतात.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** बांधकाम परवानगीच्या शर्तीचा भंग होत असेल तर अनियमीत होते.

**मा.श्री.संभाजी कदम :-** अनियमित १ वर्षाचे असून त्यांनी ६ वर्षाची पट्टी भरावी का ?

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** भाडेकरी हाच कमर्शियल होतो का ?

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** वार्षिक भाडे वर घरपट्टी लावली जाते. लॉजिक आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** लॉजिक नको

**मा.आयुक्त साहेब :-** व्यावसायिक वापर असेल तर व्यापारी आकारणी. भाडेकरी हा उत्पन्न देत असतो.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** आपण आकारणी कायद्यानुसार करता त्यात नियम आहेत का ? माझ्या कमर्शियल करही दिलेल्या भाडयाच्या प्रॉपर्टीवर आकारता ते भरतो. पण भाडेकरी हा व्यावसायिक आकारणीला प्राप्त आहे का ?

**मा.श्री.संभाजी कदम :-** भाडेक-याकडून भाडे घेत असाल तर कमर्शियल वापर समजा.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** आधार नियम सांगा ?

**मा.श्री.निखिल वारे :-** कोणत्या पुस्तकात पानावर आहे ते सांगा.

**मा.श्री.शेख नजीर :-** अमरदीप कॉम्प्लेक्सला अद्यापही पट्टी आकारणी नाही असे आठ - दहा कॉम्प्लेक्स आहेत मी पत्र देतो.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** आम्ही कर्मचा-यांना फोन करुन बोलावतो पण ते येत नाहीत.

**मा.महापौर :-** शांतता राखा.

**मा.आयुक्त साहेब :-** प्रॉपर्टी भाडयाने देतो याचा अर्थ उत्पन्न मिळते म्हणुन कमर्शियल आकारणी केली जाते.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** अशी अनेक उदाहरणे आहेत की भाडेकरी आहेत पण कमर्शियल आकारणी नाही. सर्वांना नियम सारखा लावा.

**मा.श्री.निखिल वारे :-** मनोगतात वाहतुक कोंडी बाबत उल्लेख आहे. माझ्या वॉर्ड मध्ये पार्किंग अतिक्रमणे पाडली व नंतर ती थांबवली ती सतत चालू ठेवा. त्यांच्यावर कोणाचा दबाव आहे का ?

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** ही सभा कशाची आहे बजेट की प्रश्नोत्तरांची .

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** ही प्रश्नोत्तरे बजेटचीच आहेत.

**मा.श्री.निखिल वारे :-** माझा मुद्दा या मनोगतातील आहे. त्यामुळे त्यावर चर्चा व्हावी.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** आपण बजेटवरच चर्चा करु.

**मा.श्री.निखिल वारे :-** मी आपल्या विनंतीचा आदर करतो.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** हा विषय घरपट्टी वसुलीचाच आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** हे प्रश्न शहराचे आहेत.

**मा.श्री.निखिल वारे :-** कंम्प्लीशनच्या मुद्यावरच मी बोलत आहे. अतिक्रमणचा विषय आहे. अनधिकृत बांधकामे याची व्याख्या काय त्याच्या आकारणीचा विषय आहे.

**श्री.इथापे, अतिक्रमण विभाग प्रमुख :-** महानगरपालिकेने दोन वर्षापुर्वी ज्यांना परवानगी दिली आहे त्याचा सर्व्हे करावयाचा आहे.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** ७४ इमारतींचे सर्व्हे केले ३४ इमारती अयोग्य आढळल्या २ इमारतींवर कारवाई केली उर्वरीत इमारतींवर कारवाई करण्यांकरीता वरिष्ठ पातळीवर व कायदा व सुव्यवस्थेचा विचार करुन निर्णय घ्यावे लागतात.

**मा.श्री.निखिल वारे :-** निर्णय घ्यायला दोन वर्षे लागतात का ?

**मा.आयुक्त साहेब :-** याबाबत आम्ही बैठक घेतली आहे. काही बाबी गोपनीय ठेवणे आवश्यक असते. त्याची कार्यवाही होईलच.

**मा.श्री.संजय चोपडा :-** घरपट्टी सर्व्हे नविन करावा. त्यामुळे उत्पन्न वाढेल. महानगरपालिका इमारती उद्याने येथे सोलर सिस्टीम लावल्यास खर्च कमी होईल. आपल्या मालकीच्या जागेत पे ॲण्ड पार्क योजना राबवुन उत्पन्न वाढवा. एमएसईबी व इतर विभाग रस्ते खोदतात त्यांचेकडुन फी घ्यावी ते उत्पन्न होईल. सावेडीत सभागृह / नाट्यगृह व्हावे हा प्रस्ताव धुळखात पडला आहे. पैसे आले अ ाहेत ते परतही जातील. अभ्यासीका हा चांगला उपक्रम आहे. यात लायब्ररी, कॉम्प्युटर या सुविधा असाव्यात. मी नेहमी सांगतो की आपल्या ओपन प्लॉट मध्ये कंम्पौंड वॉल घालावेत. याकरीता बजेट मध्ये तरतुद करावी. एनर्जी ऑडीट करावे. टायमरही लावले जात नाही. लोकांच्या पैशांची ही उधळपट्टी थांबवावी. माझी व नगरसेवक श्री.भोसले यांची मागणी होती की सर्व नागरिकांच्या मोफत अंत्यविधीची व्यवस्था करावी या करीता २५ लाख रुपये लागतील. याकरीता बँकेत खाते उघडुन दानशुर व्यक्तींकडुन देणग्या मिळतील. उनाड कुत्री यांचा बंदोबस्त कोठे करतो याची तरतुद इकडे वळवावी. तसेच २ लाख सोलर

दिवे दुरुस्तीची तरतुद रद्द करुन इकडे द्यावेत. अनेक शहरात अशी सोय केली आहे. तर आपणही करावी.

**मा.श्री.गणेश भोसले :-** अमरधाम बाबत ही तरतुद करावी. यामध्ये काही अडचण नसावी. याकरीता प्रत्येक नगरसेवकांनी देणगी दिली तरी काम होईल. नागरिकांना दोन ते तीन हजार रुपये लागतात. आपण या करीता तरतूद करावी दानशूर व्यक्तींना अवाहन करा. लोकांचे आशिर्वाद लागतील.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** मा.गणेश भोसले यांनी महत्वाचा विषय घेतला त्या अनुषंगाने दुसरा विषय घेतो.

**मा.श्री.संजय चोपडा :-** अमरधाम विषयाचे काय ते सांगा.

**मा.श्री.संभाजी कदम :-** ज्यांना पैसे भरुन विधी करायचे त्यांना पैसे भरुन व ज्यांना मोफत करायचा त्यांना मोफत अशी सुविधा करावी. विद्युत दाहिनी मोफत करावी. मोक्ष वाहिनी महानगरपालिकेने वापरास उपलब्ध करुन द्यावी.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** सावेडी उपनगराकरीता स्मशानभुमीची तरतुद दिसत नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** तरतुद केली आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** आरक्षण जागा पहा तरतुद दाखवा.

**मा.महापौर :-** सर्वांनी शांतता राखा.

**मा.श्री.संजय चोपडा :-** आधी रुलिंग द्या.

**मा.श्री.संभाजी कदम :-** उपनगरात सावेडीत स्मशानभुमी करावयाची आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** हे तसेच रहाते.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** मी पान नंबर सांगतो तो पहा. पान क्रमांक ९३ वर आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** त्यामध्ये सावेडी हे नांव कोठे आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** सावेडीच्या नावाने तरतुद करायला पाहिजे होती.

**मा.महापौर :-** सर्वांनी खाली बसुन घ्या शांतता राखा.

**मा.श्री.निखिल वारे :-** सावेडी स्मशान भुमी स्वतंत्र तरतुद करा.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** बोल्हेगांव व नागापुर या विभागात सुध्दा स्मशानभुमी व्हायला पाहिजे.

**मा.महापौर :-** सावेडी उपनगरात अमरधाम करीता पहाणी केली आहे त्याच्यासाठी तरतुदही केली आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** त्यामध्ये सावेडी गावाचा उल्लेख करावा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** पान नंबर २१ पहा त्यावर नविन स्मशानभुमी करीता रक्कम रु. १५ लाख तरतुद केली आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** चर्चा ही चर्चा असते.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** सावेडी असा उल्लेख करण्याचा विषय आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** तरतुद वाढवा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** केडगांव मधील स्मशान भुमी विकसीत करणे करीता तरतुद करा. मागच्या वेळी मी ही मागणी केली होती. उपनगर विकास निधी मध्ये प्रत्येक उपनगराकरीता स्वतंत्र

तरतुद करावी. महावीर कलादालनची भिंत काढण्यांत आली आहे. ही जागा मुनोत परिवाराने दिली आहे. पावसाळयात त्या इमारतीचे छत गळते. त्याचे आतुन-बाहेरुन रिन्युएशन व भिंत करावी. हे आधुनिक पध्दतीने करावी. सोलरची सिस्टीम महानगरपालिकेमध्ये विविध ठिकाणी राबवावी. या करीता अनुदानाची मागणी करावी. कुत्रे पकडण्याचे काम थांबल्या सारखे आहे. भुयारी गटार योजनेकरीता उर्वरीत भागाचा समावेश करणे करीता आर्थिक तरतुद करण्यांत यावी. ११४, ११५ सर्व्हे नंबर ही जागा स्मशान भुमी करीता राखीव आहे. त्याची कार्यवाही व्हावी. कोठी रस्त्याचे काम पॅचिंग लगेच करुन घ्यावे. चोपडा व भोसले साहेब यांनी मांडलेल्या विषयाप्रमाणे तरतुद करुन ठेवा. सर्व सभासदांनी त्यास अनुमोदन द्यावे अशी विनंती आहे.

**मा.श्री.संजय चोपडा :-** अंत्यविधी खर्च योजना दिनांक १ एप्रिल २०१३ पासुन सुरु करावी. अमरधाम मध्ये येणा-या अंत्यविधीची सुविधा इतर महानगरपालिकेप्रमाणे मोफत उपलब्ध करुन देण्यांत यावी. माझे निधी मधुन प्रत्येकी २ लक्ष रुपये नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन वर्ग करावेत. बँकेमध्ये या व्यवहारासाठी स्वतंत्र खाते उघडण्यांत यावे. जेणेकरुन मोफत सुविधेचा खर्च त्यामधुन करता येईल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** श्री.संजय चोपडा नगरसेवक यांचे निधीमधुन व माझे निधी मधुन प्रत्येकी २ लक्ष रुपये नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन वर्ग करावेत. बँकेमध्ये या योजनेचे स्वतंत्र खाते उघडल्यामुळे दानशुर व्यक्तींना तसेच सेवाभावी संस्थांना आर्थिक मदत सदर खात्यामध्ये जमा करता येईल.

**मा.महापौर :-** अंत्यविधी खर्चासाठी ५ लाख, नगरसेवक निधी मधुन प्रत्येकी ५० हजार घेण्यांत यावेत. सदरच्या योजनेसाठी बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडण्यांत यावे. ही योजना दिनांक ०१/०४/२०१३ पासुन सुरु करण्यांत यावी. तसेच महावीर कलादालन इमारत नुतनीकरण करणेसाठी १० लक्ष रुपये तरतुद ठेवणेंत यावी. शहर उपनगर हद्दवाढ विकास कार्यक्रम यामधुन सदरची रक्कम वळती करण्यांत यावी.

**मा.श्री.उमेश कवडे :-** प्रत्येक नगरसेवकांचे घेण्याची गरज नाही.

**मा.श्री.गणेश भोसले , मा.श्री.किशोर डागवाले :-** प्रत्येकाची ऐच्छिक ठेवा.

**मा.श्री.विनित पाउलबुधे :-** प्रत्येक नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन घ्यावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रक सादर करतांना कर वाढ सादर केली होती.

**मा.महापौर :-** शांतता राखा. अंत्यविधीच्या खर्चासाठी **"अंत्यविधी खर्च योजना"** लेखाशिर्ष निर्माण करुन रक्कम रुपये ५ लक्ष महापौर शहर विकास निधीच्या तरतुदीमधुन वळती करावी. तसेच सभागृहात नगरसेवकांच्या भावना लक्षात घेता नगरसेवक स्वेच्छा निधी मधुन त्यांचे लेखी पत्रानुसार त्यांना योग्य वाटणारी रक्कम सदर खर्चाच्या तरतुदी साठी वर्ग करावी. या बाबत बँकेत स्वतंत्र खाते उघडणेत यावे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** पुढचा विषय घ्या.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सन २०१३-२०१४ चे बजेट सादर करतांना करवाढ सुचविली होती. त्याला फेटाळण्याची शिफारस केली. त्याला मी अनुमोदन देतो. पारगमनमुळे किती फायदा होणार आहे व ते कधीपासुन लागू करणार.

**श्री.साबळे :-** ७ कोटी रुपयांचा फायदा होईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शासनाची मान्यता लागेल का ?

**श्री.साबळे :-** हो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** किती दिवस लागतील. नगरकरांवर भार न पडता बाहेरच्या गाडयांवर आहे. पारगमन ठेकेदाराला सांगुन नेहरुमार्केट बांधुन देणेस सांगावे. जसे नविन महानगरपालिका सभागृह बांधले तसे नविन ठेकेदाराकडुन नेहरुमार्केट बांधुन घ्या. पाण्याची परिस्थिती बिकट आहे सर्व नळांना कॉक बसवुन घ्या. या करीता कॉक न बसविणा-यांचे कनेकशन तोडा. माझ्याकडे पाणी जास्त आल्यास मी फोन करुन सांगतो. ठेकेदाराकडुन बांधकाम करुन घ्या. बुरुडगांवची जागा दिली, नेहरुमार्केटची दिली. आपण हुडकोला कोणत्या जागांची यादी दिली ते सांगा.

**मा.आयुक्त साहेब :-** यादी दिली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आपली जागा देवू नका. पारगमन मधुन मिळणा-या उत्पन्नातुन नेहरुमार्केट उभे करुन घेण्याबाबत आपले काय मत आहे. प्रिमीयमचा दरवाढ आहे फक्त त्यातुन घरपट्टी पाणीपट्टी मिळेल त्या ऐवजी जागा बांधुन घ्या. नगरोत्थान मध्ये काय काम घ्यावीत.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्या प्रॉपर्टी पाहुन ठरवावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पारगमन मधुन नेहरुमार्केट बांधुन घ्यावे. स्थायी समितीच्या शिफारशीला पाठींबा देतो.

**मा.श्री.संभाजी कदम :-** नेहरुमार्केट साठी ३ कोटी ठेवावी. २ कोटी सावेडी साठी पारगमन मधून ठेवावेत. बीओटी करीता बसलो तर वाट पहाण्यापलीकडे आपल्या हातात काहीच रहाणार नाही. बेग पटांगण चे डिपॉझिट घेवून इमारत उभी राहिली नाही.

**मा.महापौर :-** महानगरपालिकेमार्फत नेहरू मार्केट बांधणे करिता पारगमनशुल्क आकारणी मधून प्राप्त होणा-या उत्पन्नातील हिस्सा प्राथमिक तरतूद ५० लक्ष रुपये करण्यासाठी वापरात आणावी. तथापि मा.महासभेत सविस्तर प्रस्ताव ठेवुन धोरण ठरवुन महानगरपालिके मार्फत नेहरुमार्केट बांधणे बाबत निर्णय झाल्यास सदरची तरतुद उपयोगात आणावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** काय केले ते विचारा.

**मा.श्री.संभाजी कदम :-** ६० हजार पैकी २ हजार ठेवून बेग पटांगणातील गाळयांची मागणी करणा-या अर्जदार यांनी महानगरपालिकेकडे रक्कम भरल्यानंतर ती परत मिळण्याबाबत अर्ज दिल्यास ५८ हजार रुपये त्यास परत करण्यांत यावेत जेणेकरुन भविष्यामध्ये सदर गाळयांची कार्यवाही सुरु झाल्यास अर्जदार यांचा हक्क कायम ठेवावा.

**मा.महापौर :-** मा.श्री.संभाजी कदम नगरसेवक यांनी मांडलेल्या सूचनेनुसार योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. व मागणी करणा-या अर्जदार यांची सदर रक्कमेपैकी ५८ हजार रुपये परत करण्यांत यावेत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सन २०१३-२०१४ बजेट वर चर्चेकरीता सभा आयोजीत केली आहे. सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रक सादर करता पण सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकाची कामे अद्याप मंजूरी चालू आहे. आपण आदेश काढून हे थांबवले होते. त्यामुळे कामे झाली नाहीत. हे अंदाजपत्रक मंजूर झाल्यावर लगेच लागू करा ३५ कोटी थकीत करीता वर्ग केले ते चांगले आहे. अंदाजपत्रक स्थायी समिती समोर आले त्यात नविन काहीच नाही तयाचा विचार करा. आपली शेजारची शहरे पुढे जात आहेत. आमच्या सहका-यांनी सावेडी स्मशानभुमीचा विषय मांडला पण त्याची

कार्यवाही होत नाही. टी.पी. योजना मंजूर झाली आहे. त्या जागांच्या मालकांना बोलावून टीडीआर घेवून जागा द्या व स्मशानभुमी करा उद्यान विभागाच्या तरतुदींना माझा विरोध आहे. त्या उद्यानांची अवस्था वाईट आहे हे काम खाजगी करणात द्या. हे कर्मचारी इतरत्र वापरता येतील. उपनगरात २५०० ते ३००० घरे आकारणी विना आहेत त्याची कारवाई करा. नेहरुमार्केट मध्ये प्रशासनामुळे दिरंगाई झाली आहे. आपल्याकडे काम घेण्यासाठी एजन्सी का येत नाही. याचा विचार करा. याकामी बोराटे साहेबांनी सुचविले तसे पारगमन मधुन किंवा आपण घेत असलेल्या कर्जातुन तरतुद करा. आपण स्वत: दर तीन महिन्यांनी बजेट मध्ये कोणत्या विभागाची तरतुद शिल्लक आहे याचा आढावा घ्यावा. एलबीटीची टीम कमकुवत आहे. माल आयात होतांना नाक्यावरच बीलाची झेरॉक्स घ्या. घरपट्टी मध्ये कमी वसुली आहे. त्या विभागातील कर्मचा-यांच्या बदल्या करा. उद्याने जळुन गेली आहेत ती खाजगीकरणातुन विकसीत करा. वसुलीच्या बाबतीत जो निर्णय घ्याल त्याला आमचा पाठींबा आहे.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** नेहरुमार्केट उपोषण सोडविण्यास उपायुक्त यांचेबरोबर गेलो होतो. उपोषण वेळी अधिकारी रजेवर होते. प्रस्ताव महासभेकडे पाठवतो असे उपायुक्त यांनी सांगितले त्याचे काय झाले हे सांगा.

**उपायुक्त (सा) :-** आज प्रस्ताव जाईल.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** फेरीवाल्यांच्या बाबतीत काय केले त्याचा अहवाल प्रशासनाकडुन मागवावा. शहर फेरीवाला समितीचे कामकाज सुरु आहे मात्र यापुर्वी वेळोवेळी झालेल्या बैठका बाबत व निर्णयाबाबत तांत्रीक समितीचा तात्काळ अहवाल मा.आयुक्त यांनी मागवला पाहिजे. तसेच जुन्या शहरातील पाईपलाईनचा काय विषय आहे. नविन सर्व्हे केला आहे काय ? वर्किंग सर्व्हे मध्ये जुन्या शहर भागाचा व सावेडीसह इतर गावठाण भागाचा समावेश करणेंत यावा या दृष्टीने प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत महानगरपालिकेने कार्यवाही करावी.

**मा.महापौर :-** मा.आयुक्त यांनी जुने शहर व गावठाण येथील आवश्यक तो भुयारी गटार योजनेबाबत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे संबंधीत विभागास आदेश द्यावेत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आज जे भाजीवाले नेहरुमार्केटच्या बाहेर बसतात त्यांना आतमध्ये आखणी करुन बसण्याची परवानगी द्यावी.

**मा.महापौर :-** मा.आयुक्त यांनी याबाबत संबंधीत विभागास आदेश द्यावेत.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांचा प्रश्न मोठा आहे. त्यामुळे अनेक अपघात झाले आहेत. उपोषण सोडवने हे काम प्रशासनाचे असुन आम्ही केले आहे. त्यांना पत्र देखिल दिले नाही. श्री.मगर सो, श्री.परशरामी सो व्हीजीट देवुन आले. त्यांनी काहीच माहिती नाही असे सांगितले. उपोषण स्थळी कोणीच गेले नाही. त्याचा खुलासा द्यावा.

**मा.श्री.संभाजी कदम :-** आंदोलन कर्त्यांनी निवेदन दिल्यावर उत्तर दिले होते का ? संबंधितांनी माहिती द्यावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** प्रशासनाने वस्तुस्थिती सांगण्याचे काम होते.

**मा.उपायुक्त (सा) :-** दिनांक १० फेब्रुवारी रोजी नेहरुमार्केट कृती समितीने निवेदन दिले आणि दिनांक १५ फेब्रुवारी पर्यंत निर्णय घ्यावा असे निवेदन दिले होते.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** त्यानंतर आपण काय केले.

**मा.उपायुक्त (सा) :-** दिनांक १६ फेब्रुवारी पर्यंत मा.आयुक्त साहेब रजेवर होते. नगररचनाकार यांचेशी चर्चा केली व सर्व बाबींची तपासणी करुन अहवाल द्या, निर्णय द्या असे सांगितले. परंतु दिनांक १६ फेब्रुवारी पर्यंत निर्णय न झाल्याने पत्र दिले नाही.

**मा.श्री.संभाजी कदम :-** हा निर्णय महासभेचा असल्याने प्रशासन काही करु शकत नाही. हे आपण कळविणे आवश्यक असते.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** अधिकारी रजेवर असेल तर चार्ज दुस-याला देतात की नाही.

**मा.उपायुक्त (सा) :-** मी नंतर समक्ष गेलो होतो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** नेहरुमार्केट करीता पारगमन मधुन तरतुद करा.

**मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.संभाजी कदम :-** हा विषय आत्ता घ्यायचा का वेगळा घ्यावा लागेल.

**मा.आयुक्त साहेब :-** वेगळा घ्यावा लागेल. आजच प्रस्ताव देवू.

**मा.श्री.किशोर डागवाले , मा.श्री.संग्राम जगताप :-** मा.महापौर रुलिंग द्या.

**मा.महापौर :-** मा.आयुक्त साहेबांनी सांगितले की, आजच प्रस्ताव पाठवतो आम्ही सर्वसाधारण सभा काढून आठ दिवसात महासभा घेवू.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** आत्ता सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे. सावेडी प्रमाणेच केडगांव उपनगरांसाठी अमरधाम होणे आवश्यक आहे. शववाहिनी साठी तरतुद केली नाही ती करावी. तसेच पिण्याचे पाण्याची टँकर तरतुद ४० ऐवजी ६० लाख करावी.

**मा.महापौर :-** मा.श्री.शिवाजी लोंढे नगरसेवक यांच्या सुचनेची नोंद घेणेत यावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** केडगांव उपनगरासाठी प्रसुती रुग्णालय व बाल रुग्णालय याबाबत यापुर्वी मागणी केली होती परंतु कार्यवाही झालेली नाही. यावर्षी बजेटमध्ये तरतुद करण्यांत यावी.

**मा.महापौर :-** केडगांव उपनगरासाठी प्रसुती रुग्णालय व बाल रुग्णालय सुरु करण्यांत यावे याकरीता मा.महापौर शहर विकास निधीमधुन १० लक्ष रुपयांची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.निखिल वारे :-** जननी शिशु सुरक्षा योजना काय आहे ते सांगा.

**डॉ.श्री.राजुरकर :-** जननी शिशु सुरक्षा योजना हा केंद्र शासनाचा कार्यक्रम आहे. ग्रामीण भागात लागू आहे. आपण कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात जे उपचार करतो त्या सर्व सेवा मोफत करावयाच्या आहेत. मातेस घरुन कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात व तेथुन पुन्हा घरी मोफत वाहतुक सोय द्यावी लागणार आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** जर हा कार्यक्रम मोफत असेल तर नवजात बालकांना जागा व तज्ञ यांच्या अभावी नंतर विचार करता येईल हे कसे ? एक रस्ता कमी झाला तर चालेल पण माता बालकांना मोफत उपचार मिळणे आवश्यक आहे. आपल्या एखाद्या दवाखान्यात नवजात शिशु विभाग सुरु करा. तसेच नवजात शिशु आजारावरील उपचारांसाठी रुपये १० हजार प्रतिरुग्ण तरतुद करावी.

**मा.श्री.विनित पाउलबुधे :-** नविपेठ दवाखान्यात काय चालते.

**मा.श्री.निखिल वारे :-** हा मुद्दा महत्वाचा आहे. रक्तपेढी चालविण्यासाठी कंत्राटी डॉक्टर घेतात तसे येथे भरावेत. व महानगरपालिकेच्या दवाखान्यात हा विभाग सुरु करावा हि विनंती करतो.

**मा.आयुक्त साहेब :-** आज लगेच आपल्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नसल्याने सुरु करता येत नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** आपण त्यामध्ये कालावधी टाका सावेडी येथे हा दवाखाना उभा करावा.

**मा.श्री.विनित पाअुलबुधे :-** इन्फ्रास्ट्रक्चरला खर्च किती येईल.

**डॉ.श्री.राजुरकर :-** अंदाजे एक कोटी रुपये खर्च येईल.

**मा.श्री.विनित पाअुलबुधे :-** पारगमन ठेकेदाराकडुन करुन घ्या.

**मा.महापौर :-** आम्ही कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याला भेट दिली त्यावेळेस केलेल्या सूचना मा.आयुक्त कुलकर्णी साहेब यांनी मनावर घेवून सुधारणा केल्या आहेत. बाळाला अडचण आल्यास खाजगी दवाखान्यांमध्ये हलवावे लागते. यामध्ये आम्ही बारकाईने विचार करतो.

**मा.श्री.निखिल वारे :-** महापौर दुर्धर रोग निवारण निधी प्रमाणे दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील नवजात शिशुंना मदत करा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** दुर्धर रोग मदत निधी रक्कम रुपये १५ लाख करा. यामध्ये पॅरेलीसेस (अर्धांगवायू) व डायलेसिसचा समावेश करा.

**मुख्यलेखाधिकारी :-** आपण अटी शर्ती नुसार देतो.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** ही प्रकरणे तातडीने मंजूर करा. नंतर आपल्या मदतीचा उपयोग होत नाही.

**मा.श्री.संभाजी कदम :-** प्रकरण आपल्याकडे आल्यावर ३ दिवसात चेक दिला पाहिजे.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** रुलिंग द्या.

**मा.श्री.निखिल वारे :-** वाटल्यास १५ मिनीटांनी निर्णय द्या. तोपर्यंत दुस-या विषयावर चर्चा करा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** प्रकरणावर लवकर निर्णय देवून चेक द्या.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** वैद्यकीय प्रतीपुर्तीची प्रकरणे ही प्रलंबित आहेत.

**मा.सौ.किरण उनवणे :-** महिला व बालकल्याण निधी मधुन कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता मशिनरी खरेदी करणार होतो ते अजुन झाले नाही.

**डॉ.श्री.राजुरकर :-** स्टोअर मार्फत ई - टेंडर केले आहे. तिसरे टेंडर आहे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** उपकरणे खरेदीवर ३० लाख रुपये तरतुद आहे. ती उपकरणे कोणती.

**डॉ.श्री.राजुरकर :-** ऑपरेशन्स, औषधे, इतर साहित्य इत्यादी खरेदी.

**मा.श्री.संभाजी कदम :-** एक्सरे मशिन आहे काय ?

**डॉ.श्री.राजुरकर :-** होय. नविपेठ दवाखान्यात आहे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** त्याच्या दरात बदल करा. लोकांना उपयोग होईल, परवडेल असे दर ठेवा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** कर्मचारी वैद्यकीय प्रतिपुर्तीचे किती लोकांचे अर्ज होते. किती लोकांना पैसे दिले.

**श्री.अंबादास सोनवणे आस्था प्रमुख :-** गेल्या आर्थिक वर्षात २५ लाख रुपयांची मदत केली.

**मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** किती लोकांची यादी होती.

**श्री.अंबादास सोनवणे आस्था प्रमुख :-** २५ लाख रुपयांत जेवढे झाले तेवढयांना दिले. उर्वरीत प्रकरणे अकौंट विभागाकडे पाठविली आहेत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** रक्कम रुपये १५ लाख देण्यांत आले आहेत. रक्कम रुपये १० लाख अजुन शिल्लक आहेत. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये याकरीता किती तरतुद करण्यांत आली होती. जेवढी तरतुद केली तेवढी बिले देण्यांत आली का.

**मुख्यलेखाधिकारी :-** तरतुद संपली नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हे कसे काय ? मा.उपायुक्त यांनी आश्वासन दिले होते की १५ दिवसांत बिले देतो. तेही झाले नाही.

**मुख्यलेखाधिकारी :-** मार्च पुर्वी सर्वांना देवू.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** प्रतिपुर्ती योजनेच्या रक्कमेस प्राधान्य द्यावे. नंतर ठेकेदाराचे देणे द्यावे.

**मा.श्री.विनित पाऊलबुधे :-** या अनुषंगाने मी सूचना करतो की, प्रत्येक कर्मचा-याचा मेडीक्लेम करावा. जास्त मागणी आली तर प्रतिपुर्ती देता येणार नाही. त्यापेक्षा मेडीक्लेम दिला तर आपले पैसे वाचतील व कर्मचा-यांना पैसे देता येतील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मा.महापौर निधीतुन कर्मचा-यांना देता येईल काय ?

**मा.श्री.विनित पाऊलबुधे, मा.श्री.किशोर डागवाले :-** प्रिमीयम भरण्याची तरतुद लेखाशिर्ष बदलुन करावी.

**मा.श्री.सचिन पारखी :-** मागच्या वेळी भारतीय जनता पार्टीच्या वतीने काही सूचना उत्पन्न वाढी साठी दिल्या होत्या. एटीएम करीता जागा भाडयाने देणे, आपण रस्त्यांना कोटी मध्ये खर्च करतो आपल्या इंजिनियर्सना वेगवेगळया संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठवावे त्यामुळे कमी खर्चात रस्ते जतन करता येतील. शिक्षण मंडळाचे बजेट आहे. शिक्षण मंडळाचा स्वतंत्र कायदा आहे त्याकरीता त्यांना बोलवावे. बजेट २.५ कोटी रुपयांचे आहे. गणवेश खरेदी ० , बेंचेस खरेदी ० तरतुद आहे. सदस्य बैठक २ लाख रुपये, वाहन खर्च तरतुद आहे. तसेच उपनगर व वाढीव हद्द या परिसरात होणा-या गणेश उत्सवासाठी स्वतंत्र पारितोषिक देण्याबाबत मा.महापौरांनी कार्यवाही करावी. तसेच ऐन दिपावलीच्या दरम्यान कामगारांचे सानुग्रह अनुदानावरुन संप वगैरे होतात त्या करीता तरतुद करावी.

**मा.महापौर :-** यावर्षी पासुन उपनगर व वाढीव हद्द या परिसरातील गणेश उत्सव सजावट व देखावे यांना स्वतंत्र पारितोषिक ठेवले जाईल. तसेच सानुग्रह अनुदान बाबत तरतुद करणेंत येईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** दिनांक २२/०१/२००८ रोजी इतर महानगरपालिकांची माहिती मागविली. त्यानुसार स्थायी समिती मध्ये ठराव करुन शिक्षण मंडळ सभापतींना वाहन भत्ता दिला आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** शिक्षण मंडळ कायद्यात ही तरतुद आहे काय हे सांगा ?

**मा.श्री.गणेश भोसले :-** मा.कोर्टाने सभापतींचे पद कायम केले आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** कायद्याने द्यायचे का ? स्थायी समितीच्या ठरावाने द्यायचे हे कोर्टाला विचारा. शिक्षण मंडळाने सांगावे की वाहन द्यावे का नाही. शिक्षण मंडळ स्वायत्त आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** तुम्ही ठराव केला का वाहन देवू नये म्हणुन ?

**मा.श्री.सचिन पारखी :-** उपसभापती, सदस्य यांना ही वाहन असते. माझ्या प्रश्नांची माहिती द्यावी.

**मा.श्री.गणेश भोसले, मा.श्री.संजय चोपडा, मा.श्री.किशोर डागवाले :-** कृपया निर्णया घ्या व हा विषय थांबवा.

**मा.श्री.सचिन पारखी :-** याची नोंद घ्यावी. सन २०१२-२०१३ ला पेट्रोल, डिझेल खर्च वाढला. अनेक गाड्या बंद आहेत हा खर्च एवढा मोठा का वाढला.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** महानगरपालिकेकडे ८० वाहने आहेत डिझेल पेट्रोल खर्च सातत्याने भाववाढ झाल्याने आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** हा खर्च एवढा का वाढला. नियंत्रण असावे.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** पेट्रोल डिझेल तेवढेच लागत आहे परंतु त्यामध्ये भाव वाढ झाल्याने खर्च वाढत आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** इन्शुरन्स का वाढला.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** इन्शुरन्सचे ही दर वाढले आहेत.

**मा.श्री.सचिन पारखी :-** वाहन प्रतिपूर्ती हा खर्च एकदम वाढला कसा.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** अधिकारी, पदाधिकारी यांना द्यावे लागलेल्या वाहन प्रतिपुर्ती मुळे खर्च वाढला आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** शासनाने प्रतिपुर्ती बंद केली आहे. त्याचा जी.आर. आहे का ?

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** असा जी आर महानगरपालिकेस प्राप्त नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** भाडयाने घेतलेल्या सर्व वाहनांचा इन्शुरन्स आहे का ?

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** होय आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** पुढील वेळी पावती दाखवा.

**मा.श्री.संभाजी कदम :-** जेसीबी वर खर्च कीती.

**मुख्यलेखाधिकारी :-** सन २०१२-२०१३ मध्ये रक्कम रुपये ५ लाख खर्च झाला.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आम्हाला सर्व विभागाने वापरलेल्या जेसीबी च्या खर्चाची माहिती द्या.

**मा.श्री.संभाजी कदम :-** अशी जेसीबी सारखी मशिनरी स्वतः घ्यावी खर्च वाचेल. तो घण्यासाठी तरतूद करावी या बाबत माहिती द्या. विळद घाटातील कामांची माहिती द्या. त्यामध्ये जेसीबी वापरला. त्याचे बील किती काढले.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** ५ लाख रुपये झाला. ५ दिवसा करीता.

**मा.श्री.संभाजी कदम :-** १ जेसीबी घ्यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आपल्याकडे जेसीबी आहे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** दिवे बसविण्याची क्रेन गाडी प्रत्येक झोनला असावी ती भाडयाने देता येईल.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** आपल्या अंदाजपत्रकात जलतरण तलावाकरीता कीती तरतुद आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** श्री.कदम साहेब म्हणतात ते आवश्यक आहे.

**मा.महापौर :-** जुन्या साहित्याचा लिलाव करा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** जलतरण तलावाकरीता कीती तरतुद आहे.

**मुख्यलेखाधिकारी :-** रक्कम रुपये २५ लाखाची तरतुद करण्यांत आली आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** जलतरण तलावाचा ठेका किती दिवसांचा आहे.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** रक्कम रुपये २ लाख ४० हजार पाच वर्षांसाठी.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** दरवर्षी तोच दर आहे का ?

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** दरवर्षी १० टक्के वाढ होते.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** जास्त भाडे घ्यायला पाहिजे.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** हे भाडे मा.स्थायी समितीने ठरविले आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** ठेकेदार मनमानी करतो त्यावर नगरसेवकांनी पत्र दिले तर उत्तर किती दिवसांत देतात.

**मा.आयुक्त साहेब :-** मी त्वरीत उत्तर देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** मी पत्र दिले त्याचा रिपोर्ट अधिका-यांने का नाही ठेवला.

**मा.आयुक्त साहेब :-** कोणत्या विषयाचा आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** जलतरण तलाव .

**मा.श्री.गणेश भोसले :-** पत्र वाचुन दाखवा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** पत्र वाचुन दाखविले. १५ ऐवजी २० रुपये कसे वसुल करतो.

**मा.आयुक्त साहेब :-** श्री.सोनटक्के हे अधिकारी आहेत.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** घनकचरा करा बाबत मी पत्र दिले. त्याचे पत्र दिले नाही. उपायुक्त सांगतात विषय घ्यायचा नाही. हे आम्हाला सांगायला नको का ? उपायुक्तांनी नाही म्हणल्यावर मला कळविले का ?

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** त्यानंतर हा विषय आला नाही.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** पण उत्तर द्यायला पाहिजे होते.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** तुमची उपायुक्तां बरोबर काय चर्चा झाली ते सांगा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** घनकचरा कर तर सर्वांना सरसकट सारखा रक्कम रु.१२००/- आहे. हे कसे ?

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** कर आकारणी मध्ये गोंधळ आहे. त्याकरीता बैठक घ्यावी.

**मा.आयुक्त साहेब :-** मी या प्रकरणाची फाईल मागवतो व निर्णय सांगतो.

**मा.श्री.संभाजी कदम :-** हा कर आकारतांना वर्गवारी करा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आता निर्णय घेतला तरच बजेटची बैठक असल्याने लागू होईल नंतर निर्णय घेतला तर लागू होणार नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** हे बजेटच्या मागील महासभेत मंजूर झालेले आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मी त्यावेळी विरोध केला होता.

**मा.महापौर :-** यामध्ये सुधारणा केली जाईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आपला पेट्रोल डिझेलवर वार्षिक खर्च किती होतो. पुर्वी आपला पेट्रोल पंप होता. आपण जर नविन पेट्रोल पंप घेतला तर काय हरकत आहे.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** पंप घेवू नका त्यावर कोणाचाही अंकुश रहाणार नाही.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** श्री.सोनटक्के साहेब आले आहेत त्यांना विचारा दिरंगाई का होते. मी दिनांक ०५/०६/२०१२ रोजी पत्र दिले त्याचे पुढे काय झाले ?

**श्री.सोनटक्के ज्यु इंजिनिअर :-** जलतरण तलाव ठेकेदाराकडुन खुलासा मागविला त्याने सांगितले की, जादा फी घेतलेली नाही.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** मी फोटोसह दिली आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** तुम्ही चौकशी केली का. वारंवार पाहणी केली पाहिजे.

**श्री.सोनटक्के ज्यु इंजिनिअर :-** अहवाल वरिष्ठांकडे दिला आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** पारगमन बाबत असेच होत आहे. याला आळा बसला पाहिजे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बजेट पुस्तकावर चित्र छापले आहे ते कोणते आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ते मी छापलेले नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** या चित्रात दर्शविल्या प्रमाणे प्रगती कधी होणार.

**मुख्यलेखाधिकारी :-** बजेट पुस्तकावर नाटय संकुल आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** नाटय संकुल कधी होणार.

**मा.आयुक्त साहेब :-** मी उत्तर देवू का ?

**मा.श्री.गणेश भोसले :-** होय

**मा.आयुक्त साहेब :-** पायाभुत सुविधा उभारण्यासाठी वेळ लागतो. एक दोन वर्ष पुर्ण होत नाही मी पदभार घेतल्यावर अनेक प्रकल्प उभारणे कामी प्रयत्न केले आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** फक्त एलईडी चा प्रकल्प दिसतो.

**मा.आयुक्त साहेब :-** अनेक प्रकल्प सुरु आहेत.

**मा.श्री.संजय चोपडा :-** एलईडी प्रकल्पात काय अडचणी आहेत. मी पत्र दिले होते त्याचेही उत्तर नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** थर्ड पार्टी इन्स्पेक्शन झाले नाही. या कामी संस्था उपलब्ध न झाल्याने विलंब लागला आता पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेज कडुन करुन घेणार आहोत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ठेकेदाराने मला सांगितले की, माझे आर्धे पैसे मिळाले ते पैसे अधिकारी पदाधिकारी यांना वाटण्यात गेले.

**मा.श्री.सचिन पारखी :-** यात वयैक्तीक काही आहे का ?

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** किती एलईडी लावले ते सांगा. सर्व माहिती द्या. इलेक्ट्रीक सुपरवायझरने माहिती द्या वर्क ऑर्डर कधी दिली.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** ५० टक्के लाईट एलईडी बंद पडले आहेत.

**श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :-** येथे रसिक कोठारी काम करतात १०/०८/२०१२ रोजी वर्क ऑर्डर दिली ६ महिने कामाची मुदत आहे. ती नुकतीच संपली आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी तुमची आहे.

**श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :-** एलईडी चा टेस्टींग रिपोर्ट आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आयएसआय मार्क आहे का ?

**श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :-** टेंडर प्रमाणे समतुल्य आहे. कंपनीचा उल्लेख नाही.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** या फिटींग आपले कर्मचारी बसवतात.

**मा.श्री.निखिल वारे :-** श्री.बोराटे साहेबांकडील फोटो घेवून कारवाई करा.

**मा.श्री.संजय चोपडा :-** हे काम करीत नाहीत.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** उपनगरात एक सुध्दा एलईडी बसविले नाहीत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आयुक्तांनी तुम्हाला एलईडी कोठे बसवायचे याचा चार्ट सांगीतला होता. तो केला का?

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** त्याचे बील काम पुर्ण होईतोपर्यंत देवू नका.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** त्याचा ठेका रद्द करा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** ठेका रद्द केला तर आपले नुकसान होईल. त्यापेक्षा त्याच्याकडुन काम करुन घ्या.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** हायवेचे लाईट बंद झाले होते का ?

**श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :-** हो.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** अधिका-यांची कमतरता आहे, त्याकरीता स्टाफिंग पॅटर्न चे काम त्वरीत करुन घ्या.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** मग बोगस काम करायचे का ? आपले थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करायलाही कुणी तयार नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** शहरात ११,५०० पोल आहेत याकरीता चार झोनला इलेक्ट्रीकल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने नेमा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** चुकीचे काम पाठीशी घालायचे का ?

**मा.श्री.निखिल वारे :-** आम्ही चुकीचे काम करणा-याला पाठीशी घालत नाहीत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** ठेकेदाराला दिलेले बील किती. क्वॉलिटीचे काम केले का, याची चौकशी करा.

**मा.श्री.संजय गाडे :-** डीएसपी चौक ते इंद्रायणी हॉटेल काम झाले का .

**श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :-** एक महिन्यात काम होईल.

**मा.आयुक्त साहेब :-** स्टाफची अडचण निश्चित आहे. ही कामे एक जणाच्या मर्यादेच्या बाहेरची आहेत. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन झाल्याशिवाय बिल देवू नये असे आदेश दिले आहेत. पुर्ण पेमेंट अडवता येणार नाही. काम आपल्याला करुनच घ्यावयाचे आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** त्याला ब्लॅक लिस्टला टाका.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** ब्लॅक लिस्टला टाकतांना त्याच्या नावावर काम पाहिजे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ठेकेदाराचे नांव सांगा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** अंदाजपत्रकावर बोला.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** हा अंदाजपत्रकाचाच विषय आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ज्या नावावर एजन्सी आहे त्यावर कारवाई करा.

**मा.आयुक्त साहेब :-** थर्ड पार्टी इन्स्पेक्शन रिपोर्ट आल्यावर मी रिपोर्ट देईन हे अधिकार मा.स्थायी समितीचे आहेत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** एजन्सीचे नांव जाहीर करा.

**श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :-** आमद इंजिनियरींग .

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मी पत्र देतो त्याची पाहणी करा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** मी बजेट वरील विषयावरच बोलत आहे. बससेवे बाबत लोकांचा सभ्रम आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** माझी त्यांच्याबरोबर चर्चा झाली त्यामध्ये १) भाडे वाढीचा विषय होता. त्याच्यावर स्थायी समितीमध्ये निर्णय होवुन मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे पाठविले आहे. २) त्यांना जागा हवी होती. दोन तीन जागा दाखविल्या आहेत.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** जननी शिशु सुरक्षा योजना बाबत निर्णय द्या.

**मा.महापौर :-** जननी शिशु सुरक्षा योजना माध्यमातुन शिशु उपचारासाठी रुपये १० हजार प्रती लाभार्थीस देण्या बाबतच्या धोरणास ही सभा तत्वतः मान्यता देत आहे. तसेच सविस्तर प्रस्ताव तयार करुन मा.महासभेस सादर करावा.

**मा.श्री.संजय चोपडा :-** मा.प्रशासनाधिकारी मनपा शिक्षण मंडळ श्री.शिदोरे साहेब हे लवकरच सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सत्कार करण्यांत यावा.

सभागृहात श्री.शिदोर प्रशासनाधिकारी मनपा शिक्षण मंडळ यांचा सत्कार करण्यांत आला.

**मा.श्री.संभाजी कदम :-** बससेवेला १५ ते २० किलोमीटर अंतर वाढवुन वाहतुकीची परवानगी दिली तर त्यांची तुटही भरुन येईल. बेकायदा वाहतुकही कमी होईल. महानगरपालिकेने कायम उत्पन्न वाढीचे स्त्रोत शोधावेत. लाईटच्या खांबावर जाहीरातीची व्यवस्था केल्यास उत्पन्न वाढेल. नगर शहराला तीन प्रवेश व्दारे विकसीत करुन खाजगी कंपनीच्या सहकार्याने त्यांची उभारणी करावी. यामध्ये प्रवेशव्दारावर शहरातील उल्लेखनिय प्रेक्षणीय स्थळांची यादी चित्रे लावावीत. शो कर, पुतळे विकसीत करण्याबाबत या अंदाजपत्रकामध्ये काही दिसत नाही. आज पुतळयांची अवस्था वाईट आहे. नेहरु पुतळा वादग्रस्त आहे. त्याचा विकास करावा. पुतळया संदर्भात माहिती देण्यांत यावी.

**मा.श्री.संजय गाडे :-** हिराबाई भापकर यांच्या पुतळयाच्या विकासाकरीता तरतुद आहे. त्याचे काय ?

**श्री.मगर शहर अभियंता :-** भापकर पुतळयाकरीता स्वतंत्र तरतुद नाही.

**मा.महापौर :-** हिराबाई भापकर पुतळा सुशोभिकरण बाबत पत्र दिले होते. त्वरीत रिपोर्ट ठेवा महापौर निधी दिला जाईल.

**मा.श्री.संभाजी कदम :-** या पुतळया संदर्भात आपण काही केले नसेल तर करा व सुशोभिकरण करा ?

**श्री.मगर शहर अभियंता :-** सुधारणा करतो पण तरतुद वाढवावी लागेल.

**मा.महापौर :-** कदम साहेब यांनी सांगितल्या प्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी तसेच प्रवेश व्दारा बाबत पत्र दिले आहे. त्याचा खुलासा शहर अभियंता यांनी करावा.

**श्री.मगर शहर अभियंता :-** सार्वजनिक बांधकाम विभागास ना-हरकती करीता याबाबत पत्र दिले आहे. खाजगी कंपनीकडुन करणे शक्य आहे.

**मा.श्री.विनित पाअुलबुधे :-** कोंडवाडा खाजगी करणावर देवू नये कर्मचारी मुबलक आहेत. सेप्टीक टँक खाजगीकरणात घ्यावा अशी मागील वेळेस ठरले होते. त्याची कार्यवाही काय झाली. अनेक सेवा खाजगीकरणात दिल्यास कर्मचारी काय करणार. गाळे हस्तांतर बाबत माहिती मिळाली नाही. हे काम का थांबले याची प्रक्रीया काय आहे कोणी सांगेल का ?

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** मा.स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार सेप्टीक टँक उपसा सुविधा खाजगी करणाच्या माध्यमातुन विकसित करण्यांत यावी.

**मा.महापौर :-** मा.श्री.विनीत पाऊलबुधे व मा.श्री.दिलीप सातपुते नगरसेवक यांचे सुचनेनुसार प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही सत्वर करावी.

**श्री.दिवाण मार्केट विभाग प्रमुख :-** हस्तांतरण प्रक्रीया २ वर्षे चालली आहे.

**मा.श्री.विनित पाऊलबुधे :-** प्रक्रीया कशी आहे.

**श्री.दिवाण मार्केट विभाग प्रमुख :-** मुळ मालकाने पत्र द्यावे.

**मा.श्री.विनित पाऊलबुधे :-** मुळ मालकाच्या अनामत रक्कगमेचे काय ? ही १ लाख फी कमी केली तर हस्तांतरण प्रकरणे जास्त होतील.

**मा.श्री.संजय चोपडा :-** १०x१० च्या गाळयाला ही १ लाख भरायचे का ?

**श्री.दिवाण मार्केट विभाग प्रमुख :-** दिनांक २२/०८/२०१२ रोजी मा.महासभेचा ठराव झाला होता.

**मा.श्री.संजय चोपडा :-** मा.आयुक्त साहेब मी अेक सूचना मांडतो की खजुरगल्लीत जी जागा १९७२ साली छाया टॉकीज जवळील व्यापा-यांना दिली. त्यांना फक्त जागा दिली, गाळा दिला नाही. त्यांना सर्व पट्टी लावतात.

**मा.आयुक्त साहेब :-** त्यांनी नोटीसचे उत्तर द्यावे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** २ कोटी या व्दारे धरले आहेत. जर २ वर्षात काहीच केले नाही तर यावर्षी काय करणार.

**मा.आयुक्त साहेब :-** त्या गाळयात कोण आहे ही माहिती घेण्यांस सांगितले आहे.

**मा.श्री.विनित पाऊलबुधे :-** कार्यवाही काय झाली.

**मा.आयुक्त साहेब :-** विचारुन सांगतो.

**मा.श्री.संजय चोपडा, मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** एवढी फी देणार नाहीत.

**मा.आयुक्त साहेब :-** हस्तांतरण तरतूद नाही. नविन लिलाव काढावे लागतील. रक्कम रुपये १ लाख भरणे हा आपण मधला मार्ग काढला आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** प्रशासनाची मानसिकता उत्पन्न मिळविण्याची वाढविण्याची नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** मार्केट व वसुली विभागाला यावर्षी टार्गेट दिले आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** आपण मागील वर्षी १ लाख फी ठेवली, त्यामुळे एक सुध्दा गाळा हस्तांतरणाचे प्रकरण आले नाही. आपल्याला वाटाघाटी करुन मार्ग काढावा लागेल. रक्कम रुपये एक लाखापेक्षा कमी करता येणार नाही का ?

**मा.आयुक्त साहेब :-** येथील व्यवहार पाहता एक लाख फी योग्य वाटते.

**मा.श्री.सचिन पारखी :-** एक सूचना होती. वाडियापार्क येथील गाळयांची साईज ८x८ आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** याबाबत बैठकीत विचार होईल.

**मा.श्री गणेश भोसले :-** शहराच्या बुरुडगांव स्टेशनरोड या भागात उद्यान व्हावे याकरीता मागे तरतुद केली होती. पण कार्यवाही होत नाही. उद्यानाची तरतुद करा.

**मा.महापौर :-** गंगा उद्यान सारखे केडगांव मध्ये उद्यान करण्यांत येणार आहे. तसेच बुरुडगांव रोड येथे उद्यान करणेस तरतुद केली जाईल.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** फेज - १ आपल्याकडेच आहे.

**मा.श्री गणेश भोसले :-** मागच्या वेळेस २५ लाख केले ते गायब झाले. महिलांसाठी शहरात स्वच्छता गृहांची सुविधा नाही याकरीता तरतुद करण्यांत यावी.

**मुख्यलेखाधिकारी :-** या वर्षी रक्कम रुपये २० लाखांची तरतुद केली आहे.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** शहराच्या दक्षिण भागात उद्यान नाहीत.

**मा.श्री.किशारे डागवाले :-** उद्यानासाठी रक्कम रुपये ५० लाखांची तरतुद करुन घ्या.

**मा.महापौर :-** केडगांव भागात जागा आहे. ती गार्डन म्हणुन विकसित करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडुन निधी मागितला आहे. परंतु स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन १० लक्ष रुपयांची तरतुद या कामी करण्यांत यावी. तसेच बुरुडगांव रोड परिसरासाठी उद्यान विकसित करणेकरीता १० लक्ष रुपयांची तरतुद करण्यांत यावी. एकुण २० लक्ष रुपये तरतुद शहर उपनगर हद्दवाढ विकास कार्यक्रम या लेखाशिर्ष तरतुदीमधील रक्कम इकडेस वळती करावी.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** रक्कम रुपये ५० लाखांची तरतुद करण्यांत यावी.

**मा.महापौर :-** रक्कम रुपये प्रत्येकी १० लाखांची तरतुद करण्यांत आली आहे.

**मा.श्री गणेश भोसले :-** हे दोनही विषय महत्वाचे आहेत यावर विचार करण्यांत यावा.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** येथील माईक बंद पडतात. व्यवस्था नीट नाही. येणारे बोर्ड नविन कार्यालयातील सभागृहात घेण्यांत यावे.

**मा.श्री.संभाजी कदम :-** मंगलकार्यालयाच्या उत्पन्ना बाबत माहिती देण्यांत यावी.

**श्री.मगर शहर अभियंता :-** मंगल कार्यालय या लेखाशिर्षका खाली रक्कम रुपये ४ लाख ५२ हजार दिनांक ३० नोव्हेंबर २०१३ अखेर उत्पन्न झाले आहे. रक्कम रुपये ८ लाख अपेक्षित उत्पन्न ठेवले होते.

**मा.श्री.संभाजी कदम :-** भाग्योदय मंगलकार्यालयामध्ये सुधारणा करण्यांत यावी त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. याकरीता आवश्यक खर्च करुन सुधारणा करा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यांत यावा. त्याकरीता तरतुद करावी.

**मा.महापौर :-** महानगरपालिका हद्दीतील महिला व युवतींसाठी महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यांत यावा. यासाठी लेखाशिर्षामध्ये २५ लक्ष रुपये तरतुद करण्यांत यावी. मा.महापौर शहर विकास निधी मधुन सदरची तरतुद भागविण्यांत यावी.

**मा.श्री.संभाजी कदम :-** शौचालय इमारत देखभाल महानगरपालिकेकडुन करण्यांमध्ये देखभाल दुरुस्ती व आस्थापना खर्च याची आकडेवारी पाहता मोठया प्रमाणावर खर्च होतो. सदरची योजना खाजगी संस्थेमार्फत राबविण्यांत यावी. त्यानुसार खर्च कमी होवुन सदर इमारतीवरील कामगार वर्ग इतरत्र उपयोगात आणता येईल.

**मा.महापौर :-** शौचालय इमारत देखभाल दुरुस्ती खाजगी संस्थेमार्फत राबविण्यांत यावी. यासाठी लेखाशिर्षामध्ये २५ लक्ष रुपये तरतुद करण्यांत यावी. मा.महापौर शहर विकास निधी मधुन सदरचा खर्च भागविण्यांत यावा.

**मा.श्री.किशारे डागवाले :-** नविन इमारतीत सभागृहाचे काम १५ दिवसात पूर्ण होईल असे सांगितले त्याचे काय ?

**श्री.मगर शहर अभियंता :-** खुर्च्या व डेस्क बसविणे बाकी आहे. त्याची निवड झाली आहे काम पुर्ण होण्यास दीड महिना लागेल.

**मा.श्री.किशारे डागवाले :-** मंजूर करा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** अंदाजपत्रक मंजूर करावे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** अंदाजपत्रक मंजूर करण्यांत यावे.

मा.महापौर साहेब यांनी मनोगताचे वाचन केले ते पुढील प्रमाणे.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## मनोगत

महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, अहमदनगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे चरणी वंदन. हिंदूह्दय सम्राट बाळासाहेबजी ठाकरे साहेब यांचे स्मृतीस अभिवादन, तसेच शिवसेना कार्याध्यक्ष मा.श्री.उध्दवजी ठाकरे यांचे आशीर्वादाने, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब , नगर विकास राज्यमंत्री मा.ना.श्री. भास्करराव जाधव साहेब, आरोग्य मंत्री मा.ना.श्री.मनोहरजी नाईक साहेब तसेच शिवसेना उपनेते व आमचे मार्गदर्शक आदरणीय मा.आ.श्री.अनिलभैय्या राठोड, मा.आ.श्री.एकनाथरावजी शिंदे(ठाणे), मा.ना.श्री.बबनरावजी पाचपतुते आदीवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री अहमदनगर जिल्हा, मा.खा.श्री.दिलीपजी गांधी, भाजपा जिल्हाध्यक्ष मा.आ.श्री.रामजी शिंदे , मा.आ.श्री.अरूणकाका जगताप, शिवसेना जिल्हा प्रमुख मा.प्रा.श्री.शशीकांतजी गाडे सर, शिवसेना शहर प्रमुख मा.श्री.संभाजी कदम, भाजपा शहर अध्यक्ष मा.श्री.मिलींद गंधे, तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाध्यक्ष मा.श्री.कैलासमामा गिरवले, मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी तसेच महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी , नगरसेवक , नगरसेविका यांचे मार्गदर्शन व सहकार्य मला कामकाजात मिळत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची महिला महापौर या नात्याने सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रक सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत व वाढत्या शहरी करणामुळे नागरी सुविधेबाबत नागरिकांच्या अपेक्षा याची तोंड मिळवणी करताना प्रबळ मनोइच्छा ठेवून अनेक अडचणीतून मार्गक्रमण करित सदरच्या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून शहरवासियांना नागरी सुविधा देण्याबाबत योग्य अशी तरतूद करण्यात भर देण्यात आला.

१) **सावेडी भुयारी गटार योजना व केडगांव सारसनगर भुयारी गटर योजना -** सावेडी व केडगांव या दोन्ही योजनेस मा.राज्य शासनाने नुकतीच मंजूरी दिलेली आहे. मा.शासनाच्या सुचनेनुसार महापौर या नात्याने मी व मा.आयुक्त तसेच यंत्र अभियंता श्री.परिमल निकम यांनी कार्यालयीन सोपास्कार पार पाडण्याबाबत अलिकडेच मंत्रालय मुंबई येथे वेळोवेळी संपर्क साधून सदर कार्यवाही पूर्ण केली आहे. त्यामुळे मा.केंद्र शासनाने सन २०१२-२०१३ दरसुची नुसार निधी मंजूर करण्याच्या दृष्टिने विनंती करण्यात आली असून येत्या आर्थिक वर्षात निधी प्राप्त होण्यासाठी मा.केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. निधी उपलब्ध होताच योजना सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

२) **महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविणार -** महानगरपालिका हद्दीमधील महिला ,युवतीसाठी सक्षमीकरण कार्यक्रम येत्या आर्थिक वर्षात हाती घेण्यात येणार असून सदरच्या कामासाठी २५ लक्ष रूपये तरतूद करण्यात येणार आहे. व सदरचा खर्च महापौर शहर विकास निधीमधून करण्यात येणार आहे.

३) **गंगा उद्यान मिस्कीन मळा मागील मोकळया जागेवर महिला जलतरण तलाव ,जिम व जॉगिंग ट्रॅक इमारत बांधणे प्रकल्प -** उपनगरातील महिलांच्या दृष्टिने आवश्यक असलेले जलतरण तलाव , जिम व जॉगिंग ट्रॅक बांधणे कामी दिनांक ४-१-२०१३ रोजी मी ,मा.आयुक्त व संबंधीत अधिकारी यांचेसह पाहणी केली. मनपा पॅनल आर्किटेक्ट श्री.मनोज जाधव यांचेकडून या कामाची अंदाजीत एस्टिमेंट करण्यात आले असून या कामासाठी सुमारे १ कोटी ७० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

४) **शहर पाणी पुरवठा योजना फेज -२ -** महापौर पदाची सुत्रे हाती घेतल्या नंतर पिण्याच्या पाण्याच्या योजनेस प्राधान्य देवून या योजनेमध्ये लक्ष घातले. या कारणाने या योजनेतील अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईनचे रेंगाळलेले काम सुरू झाले असून शहरातील व उपनगरातील बहुतेक ठिकाणी काम प्रगती पथावर आहे. तसेच जुनी बागडे टाकी शेजारील उंच टाकी, कल्याण रोड शिवाजी नगर येथील पाण्याची टाकी, नागापूर येथील पाण्याची टाकी, निर्मल नगर येथील पाण्याची टाकीचे काम टॉप स्लॅबचे काम चालू आहे. नागरिकांसाठी लवकरच या टाक्यांचा लोकार्पण करण्यात येईल. तसेच सिध्दार्थ नगर येथील पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण करून नागरिकांसाठी लोकार्पण करण्यात आली. सदर सुविधेचा लाभ नागरिकांना मिळत आहे.

५) **जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम -**मा.केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविण्याकरिता अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत मनपाच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे सर्व गरोदर माता व नवजात बालके यांना मोफत सेवा देण्यात येणार आहे. त्यामध्ये ओपीडी , आंतररूग्ण सेवा , मोफत औषधोपचार, मोफत लायब्रोटरी तपासणी व मोफत आहार व मोफत वाहतुक सेवा पुरविण्यात येणार आहे. यासाठी लागणारा खर्च महिला व बाल कल्याण समितीच्या ५ टक्के निधीमधून करावयाचा आहे.

६) **शौचालय इमारत देखभाल खाजगी संस्थेकडे सोपविणार -** मनपा ताब्यातील सार्व. शौचालय मनपा खर्च करून देखभाल करून नागरिकांना वापरणे योग्य असे उपलब्ध होत नाही. देखभाल व आस्थापना खर्चाच्या तुलनेत हा खर्च सुविधेपेक्षा जास्त होत असलेने इमारत देखभाल व स्वच्छता खाजगी संस्थेकडे सोपविणार असून यामध्ये मनपाची मोठया प्रमाणात आर्थिक बचत होईल. यातून मनपा बराच कामगार वर्ग या कामातून काढणेत आलेने उपनगर व वाढीव हद्द भागात जेथे कामगार कमी आहेत त्या ठिकाणी वर्ग करता येतील. सदर कामासाठी अंदाजे २५ लक्ष रूपये खर्च अपेक्षित असून महापौर शहर विकास निधी या तरतुदी मधून भागविणेत येईल

७) **महापौर शहर विकास निधी -** या निधी अंतर्गत शहरातील व उपनगरातील आवश्यक ठिकाणी विकास कामे प्रस्तावित करण्यात आली होती त्यापैकी बरीच कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगती पथावर आहेत. याकामातून नागरिकांना नागरी सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

८) **रस्ता डांबरीकरण मजबुतीकरण-** नगर मनमाड रस्त्यास जोडून असलेला तारकपूर रस्ता अडथळे दूर करून रूंद करण्यात येवून रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात आले असून रस्ता व्हाईटपट्टे रंगवून कॅट आय बसवून सुशोभिकरण करण्यात आले. तसेच दिल्लीगेट ते पत्रकार चौक या रस्त्याचे डागडुजीचे संपूर्ण काम झाले असून या रस्त्यावर रहदारीच्या दृष्टीने व सुशोभिकरणाच्या दृष्टिने व्हाईट व पिवळा पट्टा रंगवून कॅट आय बसविण्यात आलेले आहेत. तसेच रंगभुवन सर्जेपूरा चौकापर्यंत रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक बसवून सुशोभिकरण करण्यात आले आहे. तसेच प्रियदर्शनी व्यापारी संकुल चौकापर्यंत डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यात आले आहे.

९) **मा.महापौर दुर्धररोग सहाय्यता निधी -** या निधी अंतर्गत महानगरपालिका हद्दीतील १०० गरजू रूग्णांना १० हजार रूपये प्रत्येकी प्रमाणे मदत करण्यात आली आहे. या निधीमधून अनेक दुर्धर स्वरूपाच्या आजारी रूग्णांना अर्थ सहाय्य करण्यात आले आहे.

१०) **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना -** मा.शासनाच्या नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत बालिकाश्रम रस्त्याचे तसेच केडगांव देवी रस्त्याचे काम चालू करण्यात आले आहे. लवकरच सदरील रस्ता पूर्ण होवून नागरिकांसाठी लोकार्पण करण्यात येणार आहे. तसेच यश पॅलेस ते कोठी रस्त्याचे रूंदीकरण,डांबरीकरण , कॉक्रीटीकरणासह इतर सुधारणा करणे व औरंगाबाद रस्त्यावरील वन विभागापासून शहर दर्गापर्यत रूंदीकरणासह डांबरीकरण करणे हे काम देखील लवकरच सुरू करण्यात येतील. तसेच या योजने अंतर्गत नगर मनमाड हायवे ते पाईप लाईन रोड ते श्रीराम चौक पर्यत तसेच पत्रकार चौक ते नागापूर पेट्रोल पंपापर्यत या रस्त्याच्या मधोमध एल.ए.डी.फिटींग बसवून रस्ता सुशोभिकरण करण्यात आला आहे.

११) **नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) -** या योजनेच्य माध्यमातून शहरातील रस्त्याची समस्या दूर होण्यास मोठया प्रमाणात मदत होणार आहे. यामध्ये २२ प्रमुख रस्त्यांचा सामावेश असून याचे कार्यारंभ आदेश देण्यात येवून नुकतेच महादेव मंदिर बुरूडगांव रोड ते चाणक्य चौक ते इम्पिरियल चौक या रस्त्याच्या कामास सुरूवात झाली आहे.

१२) **बीआरजी एफ योजना -** या योजनेमधून शहरातील महत्वपूर्ण रस्ते, गटर्स, स्ट्रिट लाईट आदी कामांचा अंर्तभाव असून या करिता मा.शासनाचा निधी उपलब्ध झालेला आहे. या बाबत कार्यालयीन कामकाज सुरू असून येत्या आर्थिक वर्षात सदरची कामे पूर्ण होतील.

१३) **केडगांव व उपनगरासाठी महिलांसाठी प्रसुती रूग्णालय व बालरूग्णालय उभारणे -** उपनगरातील गरजू , गोर गरिब महिलांसाठी प्रसुती रूग्णालय व बाल रूग्णालय होणे आवश्यक आहे.

१४) **अमरधाम वास्तु नुतनीकरण -** या वास्तुत महिलांकरिता स्नानगृह बांधकाम प्रगतीपथावर असून त्यावर गरम पाण्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टिने सौरउर्जा यंत्रणा बसविणे कार्यवाही लवकरच हाती घेण्यात येणार आहे. मुख्य प्रवेशद्वारा जवळ शंकर पार्वती मुर्ती बसविण्यात आली असून परिसर सुशोभिकरण करण्यात आलेला आहे. तसेच दहन ओटयावरील दहन जाळया बसविण्यात आल्या असून नेप्ती नाका रोडने दुसरे प्रवेशद्वार करण्यात आले असून सदरच्या प्रवेशद्वारा समोर बंद पाईप गटर करून रस्ता कॉक्रीटीकरणाचे काम चालू आहे. लवकरच सदर प्रवेशद्वाराचे नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे.

१५) **मा.शासन योजनेतून झोपडपट्टी विकास -** मा.केंद्र शासनाच्या एकात्मिक शहर व झोपडपट्टी विकास योजने(IHSDP)अंतर्गत फेज-१ करिता ४८० घरकुल योजनेकरिता रक्कम १३ कोटी २० लक्ष तसेच फेज-२ अंतर्गत ३७२ सदनिकेचा १२ कोटी ३६ लक्ष अर्थ सहाय्य मंजूर झाले आहे. सदर प्रकल्पाबाबत कार्यालयीन सोपास्कार चालू असून लवकरच सदर योजनेच्या कामास सुरूवात करण्यात येईल.

१६) **मा.राज्य शासनाच्या मागासवर्गीय व नवबौध्द घटकांकरिता घरकुल योजना -** या योजने अंतर्गत एकूण १०४ घरकुल बांधून देणेबाबत मनपास एकूण १ कोटी ४३ लाख इतके अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त झालेला आहे. या योजने अंतर्गत काही लाभधारकांनी घराचे बांधकाम चालू केल्याने त्यांना धनादेश अदा करणेत आले आहे.

**१७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना-** या योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या कामगारांसाठी ११३ घरे बांधण्यासाठी ३ कोटी ८० लक्ष रू. अनुदान मा.शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. यापैकी उर्वरित १० टक्के रक्कम महानगरपालिकेस खर्च करावयाची आहे. सदर रक्कम ३८ लक्ष १ हजार ३९० रू. असणार आहे. त्याचा खर्च मागासवर्गीय कल्याणकारी निधी मधून भागविण्यात येणार आहे. आरोग्य कामगारांना २६९ चौ.फुट एवढे क्षेत्र मिळणार असून तळमजला अधिक दोन मजले अशी इमारतीची रचना असणार आहे. सदर प्रकल्प नालेगांव स.नं. २२०, २२१ या जागेपैकी दोन एकर जागेत राबविण्यात येणार आहे. याबाबत कार्यालयीन सोपास्कार चालू असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.

**१८) तिर्थक्षेत्र विकास योजना -** या योजने अंतर्गत विशाल गणेश मंदिर परिसर सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने माळीवाडा वेश ते जुने बसस्थानका पर्यत रस्ता डांबरीकरण करण्यात आले असून विशाल गणेश मंदिर ते माळीवाडा वेश दरम्यान पेव्हींग ब्लॉक बसवून चौक सुशोभिकरण करण्यात आला आहे.

१९) **सावेडी येथे नाटयगृह उभारणे -** या कामासाठी मा.शासनाचा निधी असून या कामास मोठया प्रमाणात खर्च अपेक्षित आहे. तसेच शहरातील नाटयकर्मी यांची अनेक वर्षाची मागणी असून शहरातील नाटयप्रेमींसाठी महानगरपालिकेचे नाटयगृह उभारले जावे अशी माझी मनोमन इच्छा आहे. सदर नाटयगृह उभारणे बाबत निविदा प्राप्त झाल्या असून लवकरच याबाबत कागदपत्रे पूर्ण होवून या आर्थिक वर्षात काम सुरू होवून प्रगतीपथावर राहावे यादृष्टिकोनातून भरीव प्रयत्न करण्यात येणार आहे.

**२०) महापौर चषक स्पर्धा भरविणे -** या लेखाशिर्षावर आर्थिक तरतूद वाढविण्यात आलेली असून महिला व युवती यांचे करिता वेगवेगळया खेळांच्या तसेच इतर बौध्दीक स्पर्धा आयोजन करण्याचा मानस आहे.

**२१) कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना रक्तपेढी -** सदरची रक्तपेढी त्रुटीमुळे मा.शासनकडून बंद करण्यात आली होती. याबाबत मा.ना.मंत्री महोदय यांचेकडे समक्ष भेट देवून मा.शासनाकडे पाठपुरावा करून रक्तपेढी मधील त्रुटी दूर करून अद्यावत रक्तपेढी नुतनीकरण केलेल्या वास्तुसह नुकतेच लोकार्पण करण्यात आले असून गोरगरीब रूग्णांकरिता अल्पदरामध्ये सुरू करण्यात आलेली आहे.

**२२) सावेडी व उपनगर यांचेकरिता स्वतंत्र गणेश उत्सव पारितोषिक-** सावेडी तसेच उपनगरातील अनेक गणेश मंडळांना आरास व सजावट ,देखावे या दृष्टिकोनातून प्रोत्साहन मिळण्यासाठी स्वतंत्र पारितोषिक जाहिर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**२३) नागरी दलितवस्ती सुधार योजना -** या योजनेस निधी उपलब्ध असून निविदा दाखल असून लवकरच कार्यवाही होईल.

**२४) कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना नुतनीकरण व आवश्यक बांधकाम -** या कामा करिता मा.महिला बाल कल्याण समिती यांच्या मार्फत कै.बाळासाहेब देशपांडे येथे रंगरंगोटी , खिडक्या दुरूस्त करणे आदी कामे करून दवाखाना नुतनीकरण करण्यात आलेला आहे.

**२५) महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करणार -** या उद्यानामधून वास्तुची नागरिकांना आणखी सोय सुविधा उपलब्ध व्हाव्यात व निगा रहावी या दृष्टिकोनातून बी.ओ.टी. तत्वावर खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करण्याचा मानस आहे.

सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रक प्रशासनाने तयार करून मा.स्थायी समितीपुढे सादर केले आहे. मा.स्थायी समितीने सुचना ,दुरूस्त्या ,फेरफार व शिफारशीसह मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत व नागरी सुविधेचे प्रकल्प पूर्ण करण्याचे प्रबळ मनोइच्छा याची तोंड मिळवणी करत व शहर विकासाच्या दृष्टिने विकासाचा निश्‍चितच कार्यक्रम शहरवासियांसाठी राबविताना आपल्या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य याची नम्रपूर्वक अपेक्षा करित आहे. ते मार्गदर्शन व सहकार्य मला आपणा सर्वांनकडून निश्‍चितपणे मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी , नगरसेवक , नगरसेविका अधिकारी व पत्रकार मित्र तसेचयांनी माझे मनोगत शांतपणे ऐकूण घेतले याबद्दल आभार.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

(शीलाताई अनिल शिंदे)
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

---*---

## ठराव :-

ऑफिस रिपोर्ट व मा.स्थायी समितीने सादर केलेला प्रस्ताव, केलेल्या सूचना, दुरुस्त्या फेरफार तसेच कर-दरा बाबत केलेल्या शिफारशी तसेच मा.महासभेत झालेली व्यापक चर्चा मा.सदस्यांनी केलेल्या सुचना, दुरुस्त्या, फेरफार यासह सन २०१२-२०१३ चे सुधारीत व सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे मुद्यांबाबत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

१) महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविणे - महानगरपालिका हद्दीतील महिला व युवतीसाठी सक्षमीकरण कार्यक्रम हाती घेता यावा यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यात यावे. सदरच्या लेखाशिर्षामध्ये महापौर शहर विकास निधीमधून २५ लक्ष रू. तरतूद कमी करून इकडेस घेण्यात यावी.

२) गंगा उद्यान मिस्कीन मळा मागील मोकळया जागेवर जलतरण तलाव, जॉगिंग ट्रॅक व जिम बांधणे या कामासाठी मा.स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम - मा.केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व मा.स्थायी समितीने सादर केलेला अंदाजपत्रकातील प्रस्ताव क्र. ६ नुसार कार्यवाही करणेस तसेच सदरची योजना राबविणेस मान्यता देण्यात येत आहे. दि. ०१-०४-२०१३ पासून सदरची योजना अंमलात आणण्यात यावी.

४) केडगांव व उपनगरासाठी महिलांसाठी प्रसुती व बाल रूग्णालय उभारणे स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करून महापौर शहर विकास निधीमधून १० लक्ष रूपये तरतूद करण्यात यावी. तसेच महावीर कलादालन इमारत नुतनीकरणासाठी १० लक्ष रुपये तरतूद करण्यात यावी.

५) मनपा कर्मचा-यांना दिपावली सणा दरम्यान सानुग्रह अनुदान देणे बाबत रक्कम रु.१ कोटी २० लक्ष रुपये तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदरचा खर्च घरपट्टीच्या अपेक्षित उत्पन्न गाठण्याच्या दृष्टीने उपाययोजना करुन त्यामधुन भागविण्यांत यावा. नियमानुसार कार्यवाही करावी.

६) महापौर दुर्धर रोग सहाय्यता निधी १५ लक्ष रूपये तरतूद ठेवण्यात यावी. तसेच १० हजार रूपये प्रतिरूग्ण अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच धनादेश मिळण्यास मोठा विलंब होतो अशी रुग्णाचे नातेवाईक व मा.नगरसेवक यांनी खंत व्यक्त केली आहे. त्याचा विचार करता सदरची कार्यालयीन कागदपत्राची कार्यवाही पूर्ण करून अर्ज केल्यापासून १० दिवसा पर्यत धनादेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

७) नवजात शिशु करिता दहा हजार रूपये अर्थ सहाय्य करणेकामी ही सभा तत्वता मान्यता देत आहे. सदरचा खर्च महिला व बाल कल्याण कार्यक्रमामधून भागविण्याच्या दृष्टिने याबाबतचा सविस्तर आवश्यक कार्यालयीन प्रस्ताव तयार करून येत्या महासभेपुढे ठेवण्यात यावा. तसेच या कार्यक्रमासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करणेत यावे. व प्राथमिक तरतूद करण्यात यावी.

८) महानगरपालिका मालकीच्या जागेमध्ये ए.टी.एम. सुविधा सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी त्याबाबतचे विविध बँका, महामंडळे , पतसंस्था यांचे प्रस्ताव मागविण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी. जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये भर पडेल.

९) नेहरू मार्केट बांधणेबाबत येणा-या अडीअडचणी बाबत उहापोह असणारा प्रशासनाचा अभिप्राय असणारा स्वतंत्र प्रस्ताव सविस्तररित्या तयार करून येत्या महासभेपुढे धोरण ठरविण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी ठेवण्यात यावा. तसेच याकामी भविष्यामध्ये अडचण येवू नये यासाठी मनपा मार्फत बांधणे बाबत निर्णय प्रक्रियेस मान्यता मिळाल्यानंतर कार्यवाही करण्याच्या दृष्टिने व कामास गती मिळण्यासाठी महानगरपालिकेमार्फत नेहरू मार्केट बांधणे करिता पारगमनशुल्क आकारणी मधून प्राप्त होणा-या उत्पन्नातील हिस्सा प्राथमिक तरतूद ५० लक्ष रुपये करण्यासाठी वापरात आणावा.

१०) अमरधाम नालेगांव, केडगांव तसेच स्टेशन परिसर येथील वास्तुमध्ये अंत्यविधीचा खर्च महानगरपालिकेने करावा. याकामी ही सभा मान्यता देत आहे. यासाठी अंत्यविधी खर्च योजना असे स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करुन त्यामध्ये ५ लक्ष रूपये तरतूद महापौर शहर विकास निधीमधून वळती करण्यांत यावी. याबाबत मा.सदस्य यांचे इच्छेनुसार प्रभाग स्वेच्छा निधी मधुन त्यांचे प्राप्त होणा-या पत्रानुसार निधी वर्ग करण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी. तसेच या कामाकरीता बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडण्यांत यावे. दानशुर व्यक्ती , सामाजिक संस्था यांचेकडुन याकामी अर्थसहाय्य मिळणेसाठी प्रयत्न करणेंत यावेत. दिनांक ०१/०४/२०१३ पासुन सदरची योजना सुरु करावी.

११) सेप्टीक टँक उपसा करणे ही सुविधा खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करण्यास ही सभा मान्यता देत आहे. याबाबत लवकरात लवकर निविदा मागवून दि. १-४-२०१३ पासून अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी.

१२) मनपा सार्व.शौचालय इमारत देखभाल व दुरूस्ती खाजगीकरणाच्या माध्यमातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे. याकामी अंदाजे २५ लक्ष रूपये खर्चाची तरतूद करण्यात यावी. सदरचा खर्च महापौर शहर विकास निधी मधून भागविण्यात यावा.

१३) बेग पटांगण येथे व्यवसायासाठी गाळा मिळणेकामी रक्कम रुपये ६० हजार महानगरपालिकेकडे जमा केलेले आहेत अशा पैकी काही अर्जदार यांनी रक्कम परत मिळणे बाबत मागणी केली आहे. रक्कम रुपये २ हजार ठेवुन उर्वरीत रक्कम मागणी केलेल्या व मागणी करणा-या अर्जदार यांना तात्काळ परत करावी. याबाबत मा.आयुक्त यांनी संबंधीत विभागास तसे आदेश द्यावेत.

**१४)** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील गणेश उत्सव देखावे व सजावट यांना पारितोषिक देणे बाबत कार्यवाही होत असते. तथापि सावेडीसह सर्व उपनगरातील भागांना देखिल गणेश उत्सव साजरा करतांना सादर करण्यांत येणारे देखावे व सजावट यांना त्यांचे कामात प्रोत्साहन मिळण्यासाठी स्वतंत्र पारितोषिक ठेवण्या बाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

**१५)** महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग या वास्तु मधुन नागरिकांना आणखी सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यास्तव खाजगी करणाच्या माध्यमातून (बी.ओ.टी.तत्वानुसार) विकसीत करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यांत यावी.

१६) केडगांव भागात जागा आहे. ती गार्डन म्हणुन विकसित करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन १० लक्ष रुपयांची तरतुद करण्यांत यावी. तसेच बुरुडगांव रोड परिसरासाठी उद्यान विकसित करणेकरीता १० लक्ष रुपयांची तरतुद करण्यांत यावी. एकुण २० लक्ष रुपये तरतुद शहर उपनगर हद्दवाढ विकास कार्यक्रम या लेखाशिर्ष तरतुदीमधील रक्कम इकडेस वळती करावी.

सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरुस्त्या व फेरफार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाऊ

अनुमोदक - मा.सौ.खरमाळे संगिता रत्नाकर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

दिनांक  २०-२-२०१३ रोजी सन २०१३-२०१४ करिता अंदाजपत्रकाबाबत बोलविण्यात आलेल्या महासभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार लेखाशिर्ष रकमेत करावयाच्या बदला बाबत फेरफार तक्ता

| अ.नं. | नांव | रक्कम मुळ तरतुद | कमी | जास्त | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविणे | | | २५.०० लक्ष | |
| २ | बुरूडगांव रोड व केडगांव या उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी १० लक्ष रूपये ) | | | २०.०० लक्ष | |
| ३ | केडगांव व उपनगरासाठी महिलांसाठी प्रसुती व बाल रूग्णालय उभारणे | | | १०.०० लक्ष | |
| ४ | महावीर कलादालन इमारत नुतनीकरण | | | १०.०० लक्ष | |
| ५ | नेहरू मार्केट इमारत बांधणे | | | ५०.०० लक्ष | |
| ६ | मनपा शौचालय देखभाल व दुरुस्ती खाजगी संस्थेमार्फत करणे | | | २५.०० लक्ष | |
| ७ | अंत्यविधी खर्च योजना | | | ५.०० लक्ष | |
| ८ | टँकरव्दारे पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणे | ४०.०० लक्ष | | २०.०० लक्ष | ६०.०० लक्ष |
| ९ | महापौर शहर विकास निधी | ४००.०० लक्ष | ७५.०० लक्ष | | ३२५.०० लक्ष |
| १० | शहर उपनगर हद्दवाढ विकास कार्यक्रम | २००.०० लक्ष | ५०.०० लक्ष | | १५०.०० लक्ष |

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर |
|---|
| मा. सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प |
| |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१३)........................................................१३१६६३१३१ |
| एकुण जमा........................................................................................ ४०५२९३०००० |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा......................................................... ४१८४५९३१३१ |
| एकुण खर्च........................................................................................ ४१२८७५५००० |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१४)................................................. ५५८३८१३१ |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | मा.सर्वसाधारण सभेने केलेला बदल | | मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविणे | ० | २५००००० | | २५००००० |
| २ | बुरुडगांव रोड व केडगांव रोड या उपनगरांमध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी १० लक्ष रुपये) | ० | २०००००० | | २०००००० |
| ३ | केडगाव उपनगरासाठी महिलांसाठी प्रसुती व बाल रुग्णालय उभारण | ० | १०००००० | | १०००००० |
| ४ | महावीर कलादालन इमारत नुतनीकरण | ० | १०००००० | | १०००००० |
| ५ | नेहरु मार्केट इमारत बांधणे | ० | ५०००००० | | ५०००००० |
| ६ | सार्व.शौचालय देखभाल दुरुस्ती (खाजगी संस्थेमार्फत) | ५००००० | २५००००० | | ३०००००० |
| ७ | अंत्यविधी खर्च योजना | ० | ५००००० | | ५००००० |
| ८ | टँकर्सव्दारा पाणी पुरवठा करणे | ४०००००० | २०००००० | | ६०००००० |
| ९ | महापौर शहर विकास निधी | ४००००००० | | ७५००००० | ३२५००००० |
| १० | शहर,उपनगर,हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम | २००००००० | | ५०००००० | १५०००००० |
| | | **६४५०००००** | **१६५०००००** | **१२५०००००** | **६८५०००००** |

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.